१४ वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३८ ■ बुधवार, दि.१७ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# ऑपरेशन टायगर झाले पुर्ण

## ठाकरेंच्या 6 फुटीर खासदारांचा गट स्थापन ▶▶ आता शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होणार !








वृत्तसंस्था १७ जून

**नवीदिल्ली :** उद्धव ठाकरे यांची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी अखेर दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांना भेटून आपण स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र दिले. लोकसभा अध्यक्षांनी या स्वतंत्र गटाला मंजूरी दिली असून बंडखोर खासदारांच्या स्वतंत्र गटाच्या स्थापनेची प्रक्रिया दिल्लीत पूर्ण झाली आहे. त्यानंतर हा गट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. काल रात्रीपासून ठाकरे गटाचे फुटीर खासदार एक-एक करुन दिल्लीत दाखल व्हायला सुरुवात झाली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील काल रात्री दिल्लीत दाखल झाले होते. यानंतर ठाकरे गटाच्या बंडखोर खासदारांना अज्ञातस्थळी ठेवण्यात आले होते. काहीवेळापूर्वीच या सहा बंडखोर खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासोबत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची भेट घेऊन आपला स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र सादर केले. लोकसभा अध्यक्षांच्यादेखत बंडखोर आमदारांनी पत्रावर सह्या केल्या. त्यामुळे या खासदारांच्या स्वतंत्र गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिली.

पक्षांतरबंदी कायद्यानुसार, स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी आमदार किंवा खासदार संख्येच्या एकूण संख्याबळाच्या दोन तृतीयांश संख्याबळाची गरज असते. ठाकरे गटाचे एकूण नऊ खासदार आहेत. यापैकी सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला आहे. त्यामुळे या गटाला अधिकृत मंजुरी मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु होती. मात्र, दिल्लीतील भाजपश्रेष्ठींना या ऑपरेशनला ग्रीन सिग्नल दिला नव्हता. अखेर १० जून रोजी दिल्लीत झालेल्या एनडीएच्या बैठकीनंतर अमित शाह यांनी पंतप्रधान मोदींशी बातचीत करुन या ऑपरेशनला ग्रीन सिग्नल दिला. यानंतर दिल्लीतील एका हॉटेलमध्ये ठाकरे गटाचे बंडखोर खासदार एकनाथ शिंदे यांना भेटले होते, त्यानंतर

### ५० कोटीत एक खासदार - संजय राऊत

पत्रकार परिषदेत बोलताना खासदार संजय राऊत यांनी काल रात्रीच्या घडामोडींचा खुलासा केला. काल रात्री ११ वाजेच्या सुमारास मला एका विश्वासू सूत्राने माहिती दिली की, महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्याची मोठी डील झाली आहे. प्रत्येकी ५० कोटी रुपयांना खासदारांना विकत घेतले जात असून, काल रात्रीच १५ कोटींचा ॲडव्हान्स दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली. मी ती लगेच सोशल मीडियावर जाहीर केली,' असे राऊत म्हणाले.

### ओमराजे निंबाळकरांवर खटल्याच्या निकालासाठी दबाव

२० वर्षांपूर्वी ओमराजे निंबाळकर वडीलांची हत्या झाली. गेली २० वर्षे तो खटला सुरू आहे, काल त्यांचा निकाल होता, मुंबई हायकोर्टात पण ओमराजे निंबाळकरांवर दबाव टाकण्यात आला की तुमच्या बाजूने निकाल हवा असेल तर आमच्या गटात सामील व्हा. संजय राऊत म्हणाले की, खून प्रकरणचा निकाल तुमच्या बाजूने हवा असेल तर तुम्ही या लेटरवर सही करा आणि आमच्यासोबत या. जर देशाचा कायदा आणि न्यायव्यवस्था या पद्धतीने चालत असेल तर तर काय संविधान आणि काय न्यायव्यवस्था त्यामुळेच या प्रकरणाचा निकाल दोन दिवस पुढे ढकलला गेला.

### ऑपरेशन टायगर नव्हे , ऑपरेशन गिधाड -पटोले

महाराष्ट्रातील 'ऑपरेशन टायगर'वरून काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन गिधाड आहे, असे म्हणत त्यांनी सत्तेसाठी सुरू असलेल्या राजकीय हालचालींवर निशाणा साधला. लोकशाही व्यवस्थेत जनता पक्षाला मत देते, मात्र सत्ताधारी इतर पक्षांतील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना आपल्या बाजूने वळवून सत्तेचा माज दाखवत असल्याचा आरोप त्यांनी केला. नाना पटोले म्हणाले, सत्तेची भूक असावी, पण मोदी आणि त्यांच्या आघाडीने ती मर्यादाही ओलांडली आहे. लोकशाही व्यवस्थेची हत्या करण्याचे काम सुरू आहे. तसेच लोकसभा अध्यक्षांच्या स्वायत्ततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, स्पीकरही मोदी-शहा सांगतील तेच करतात, असा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पटोलेंचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.

# पातूर रोडवरील रिलायन्सच्या प्लांटला भीषण आग !

## आग विझविण्याचे प्रयत्न सुरूच, आकाशात धुराचे लोटच लोट, परिसरातील नागरिकांमध्ये भीती

प्रतिनिधी १७ जून



**अकोला :** पातूर रोडवरील (हरिसाल-नांदेड राष्ट्रीय महामार्ग) चांदूर-बारलिंगा परिसरात असलेल्या रिलायन्स कंपनीच्या बॉटलिंग प्लांट परिसरात मंगळवारी रात्र उशिरा भीषण आग लागली. अचानक आगीचे लोळ वातावरणत दिसत असल्याने परिसरातील नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सर्वत्र धुराचे लोट दिसत असल्याने आगीची भीषणता लक्षात येत होती. ही आग विझविण्यासाठी महानगरपालिका अकोल्याचे दोन अग्नीशमन दलाच्या गाड्या व एक एमआयडीसीची गाडी प्रयत्न करीत होती. मात्र दुसरा दिवस उजाडला तरी आग धुमसतच होती.

मंगळवारी रात्री उशिरा लागलेल्या या आगीने एकच खळबळ उडाली. अचानक उसळलेल्या आगीच्या प्रचंड ज्वाळा आणि आकाशाला भिडणारे धुराचे लोट पाहून परिसरातील नागरिक घटनास्थळाकडे धाव घेत होते. घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर बचाव व नियंत्रण कार्य सुरू केले.

कंपनीमधून अचानक धूर निघू लागल्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणात उसळल्याने परिसरातील कामगार आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच अकोला मनपा अग्निशमन दलाच्या दोन गाड्यांसह जवान घटनास्थळी दाखल झाले तसेच एमआयडीसी भागातूनही एक गाडी घटनास्थळी दाखल झाली होती.

### ...तर मोठा अनर्थ घडला असता!

या प्लांटमधून औद्योगिक गॅसचा पुरवठा होत असल्याची माहिती समोर येत असून ही आग इतरत्र पसरली असती तर फार मोठा अनर्थ घडला असता, अशी चर्चा घटनास्थळी सुरू होती. या भीषण आगीमध्ये नेमके किती नुकसान झाले, याची माहिती आग पूर्णपणे आटोक्यात आल्यानंतर समजणार असून तसेच घटनेमागील कारणांची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# ऑपरेशन टायगरशी भाजपचा संबंध नाही-बावनकुळे

प्रतिनिधी १७ जून

**मुंबई:** राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांवर भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत भाजपचा या घडामोडींशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला मजबूत सरकार मिळाले असून देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे मुख्यमंत्री आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच संजय राऊत यांनी खासदारांना १५ कोटींचा ॲडव्हान्स दिल्याचा केलेला दावा अत्यंत चुकीचा आणि बिनबुडाचा असल्याचे त्यांनी म्हटले. बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीवर थेट निशाणा साधताना म्हटले की, 'उद्धव ठाकरेंनी आधी स्वतःचा पक्ष सांभाळावा. त्यांचे आमदार आणि खासदार त्यांना सोडून का चालले आहेत? आपले लोक कुठे जात आहेत आणि का जात आहेत, याचे त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. आपल्याच लोकांना सांभाळता येत नसल्याने विरोधक भाजपवर नाहक आरोप करत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

# पातूर नगर परिषद निवडणूक रणधुमाळी आरआरसी नेटवर्कने जाणला जनतेचा कौल

प्रतिनिधी १७ जून



**पातूर:** पातूर स्वराज्य संस्थेच्या सत्तेची चावी कुणाकडे राहील. नगर परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारांच्या मनात काय चाललंय? यावर 'आरआरसी न्यूज'ने थेट जनतेच्या दरबारात जाऊन घेतलेला विशेष कौल आज औत्सुक्य निर्माण करणारा ठरला. या निवडणुकीत कोणते फॅक्टर महत्त्वाचे ठरणार यावर वक्त्यांनी आपली मते निर्भीडपणे मांडली.

नगराध्यक्षपदाचे उमेदवार सचिन ढोणे, नगरसेवक पदाचे उमेदवार अजय गजानन पाटील, राजू उगले ,पूनम बायस, निशा निखाडे, कैलास उगले, आनंद तायडे, व परसरामजी उंबरकर, डॉ. प्रशांत लोथे, संगीता इंगळे, संजय निखाडे, संजय बगाडे, नवीन ढोकणे, तुकाराम श्रीनाथ, भगवान श्रीनाथ, वासुदेव सौंदळे यांनी आरआरसीच्या रणधुमाळीमध्ये सहभाग घेतला. अतिशय वादळी चर्चा झाली. तसेच आर आर सी नेटवर्कने निवडणुकीच्या वातावरणात रंग भरल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# आईवर तलवारीने वार; नंतर मुलाची निर्घृण हत्या



तिघे पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी १७ जून

**रिसोड :** शहरातील हिंगोली मार्गावरील माणुसकी नगर भागात १५ जून रोजी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास एक रक्ताळलेला थरार घडला. जुन्या वादाचा राग मनात धरून, रस्त्यावरील नालीच्या ढाप्यावर गाढ झोपेत असलेल्या ३८ वर्षीय युवकाचा डोक्यावर दगड आणि लोखंडी रॉडने जबर वार करून निर्घृण खून करण्यात आला. भगवान सुभाष गायकवाड असे मृतकाचे नाव आहे. या घटनेच्या काही तास आधीच आरोपींनी मृतकाच्या आईवर तलवारीने वार करून त्यांना गंभीर जखमी केले होते. एकाच रात्री घडलेल्या या प्राणघातक हल्ल्यामुळे आणि हत्येमुळे संपूर्ण रिसोड शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी आठ जणांविरोधात हत्येसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून तिघांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी आरोपींवर कलम १०३ (१), १८९ (२), १९०, १९१ (२), १९१ (३), ११८, ११५ (२) आणि ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील तीन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# गजानन नागरीच्या भ्रष्ट संचालकांना केव्हाही होऊ शकते अटक

प्रतिनिधी १७ जून




**अकोला:** गजानन नागरी पतसंस्थेमध्ये एकूण १८ करोड ६९ लाख रुपयांचा घोटाळा झाल्याचा गुन्हा दाखल आहे. आर्थिक गुन्हे शाखेमार्फत याचा तपास सुरू आहे. या प्रकरणात इतर आरोपींचा शोध आर्थिक गुन्हे शाखा घेत असून संचालकांचे बँक खाते, प्रॉपर्टी सिल करणे सुरु असल्याचे तपास अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

गजानन नागरी पतसंस्थेतील मुख्य आरोपी नंदकिशोर आवारे हा जवळपास १३ दिवस पोलिसांच्या कस्टडीमध्ये होता. त्याच्याकडून बरीचशी माहिती गोळा केलेली आहे. तसेच पतसंस्थेमधला जो काही कामाचा रेकॉर्ड आहे तो पण आम्ही जप्त केलेला आहे. संस्थेत आलेला पैसा हा गेला कुठल्या रस्त्याने, कुठे कुठे गेला, त्यांच्या प्रॉपर्टी कुठे आहेत? याबाबत शोध घेणे सुरू आहे. त्यांच्या प्रॉपर्टी, संचालकांच्या प्रॉपर्टी कुठे आहेत? काही संचालकांचे बँकेचे अकाउंट सुद्धा फ्रीझ करून ठेवलेले आहेत. पुढील तपास आणखी चालू आहे. संचालकांचा शोध घेऊन त्यांना सुद्धा त्वरित अटक करण्याची तजवीज ठेवलेली आहे. संचालकांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, परंतु तो अर्ज फेटाळलेला आहे त्यांना केव्हाही अटक होऊ शकते.

### स्वतःचे पैसे मिळण्यासाठी ठेवीदारांची आता धावाधाव

आयुष्यभर नोकरी करून, पोटाला चिमटा काढून आलेला पैसा या पतसंस्थेत ठेवला होता. विचार केला होता, म्हातारपणी पोरांच्या समोर हात पसरावे लागणार नाहीत. आज औषधाला पैसा नाही आणि आमचा हक्काचा पैसा मागायला गेलो तर टाळं ठोकलेलं दिसतं. आम्ही जगायचं कसं?'... पोलीस ठाण्यात, आजकाल गजानन नागरी पतसंस्थेच्या दारात आणि पोलिसांच्या पायऱ्यांवर असे अनेक हताश चेहरे रोज पाहायला मिळत आहेत. कोट्यवधी रुपयांच्या या घोटाळयाने गजानन नागरी पतसंस्थेच्या शेकडो ठेवीदारांना रस्त्यावर आणले आहे. यात सर्वाधिक संख्या आहे ती सिनिअर सिटीझन्सची . ज्या वयात घरात बसून देवाधर्माचे नाव घ्यायचे, नातवंडांसोबत खेळायचे, त्या वयात हे वृद्ध उन्हातान्हात, थरथरत्या हातांनी आपल्या हक्काच्या पैशांचे कागदपत्रे घेऊन पोलिसांचे उंबरठे झिजवत आहेत. या संपूर्ण घोटाळयात आता पोलिसांच्या भूमिकेवरही ठेवीदारांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कोट्यवधी रुपयांचा अपहार एका रात्रीत किंवा एका व्यक्तीने केलेला नाही, हा उघड व्यवहार आहे. मग असे असताना... इतर आरोपींवर कृपादृष्टी का? पोलिसांनी आतापर्यंत केवळ एकाच आरोपीला अटक केली आहे. घोटाळा एवढा मोठा असताना बाकीचे संचालक, अध्यक्ष आणि कर्ज बुडवणारे हुशार लोक अजूनही मोकाट कसे? मास्टरमाइंड कोण? एकाच आरोपीला अटक करून पोलीस या प्रकरणावर पांघरूण घालत आहेत का? अशी शंका आता त्रस्त ठेवीदार जाहीरपणे विचारत आहेत.







CMYK



# कमलाबाई सोहोनी भारतातील पहिल्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.)!

कमला सोहोनी यांचा जन्म १८ जून १९११ रोजी इंदोर येथे झाला होता. त्यांचे वडील नारायण भागवत आणि काका माधवराव भागवत हे इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स मधून रसायनशास्त्र विषयावरची पदवी घेणाऱ्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकी एक होते.कमला सोहोनी' यांनी बालपणीच या दोघांकडून विज्ञानाचे धडे गिरवले होते. ज्येष्ठ साहित्यिका दुर्गा भागवत आणि कमला दोघी बहिणी होत्या. मुंबई विद्यापीठातून एम.एस्सी. त्या काळात पदवी मिळवणा-या कमला एकमेव आणि पहिल्या महिला होत्या. तंत्रज्ञान संशोधन शिष्यवृत्ती आणि स्पिंगर रिसर्च शिष्यवृत्ती मिळवल्यानंतर त्यांनी 'इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बेंगलोर' या संस्थेत प्रवेश मिळवला. या संस्थेत प्रवेश मिळवण्यासाठी देखील त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. तेथे डॉ. सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली, तर पुढे केंब्रिजमध्ये प्रा. एफ. हाफकिन्स यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधनकार्य केले. मुंबई, दिल्ली आणि बडोदा येथील महाविद्यालयांतून जीवरसायशास्त्र विभाग सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. म्हशीचे दूध मातेच्या दुधासमान करण्याची प्रक्रिया शोधणे, दुधातील व कडधान्यांतील प्रथिने शोधणे, निरा पेयाचे परिणाम व उपयोग आणि ताडगुळाविषयीचे त्यांचे संशोधन केले.

ब्रिटिश अंकित राष्ट्रातली एक हिंदुस्थानी मुलगी म्हणून त्यांना आपल्या शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. इसवी सन १९३३ मध्ये रसायनशास्त्र हा विषय घेऊन त्या पहिल्या वर्गात बी.एस्सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांनी वर्तमानपत्रातीत जाहिरातीनुसार शास्त्रीय संशोधनासाठी बंगलोर येथील 'इंडियन इन्स्टिटच्यूट ऑफ़ सायन्स'मध्ये अर्ज केला. टाटांनी १९११ मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेत प्रवेश मिळणे अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाई. प्रवेशासाठी कमलाबाई पूर्णपणे पात्र होत्या, परंतु संस्थेचे प्रमुख, नोबेल पारितोषिक विजेते सर सी.व्ही. रामन यांनी 'मुलगी असल्याने प्रवेश देता येत नाही' असे कमलाबाईंना कळविले. कमलाबाई रामन यांना प्रत्यक्ष भेटल्या व 'मुलगी म्हणून माझ्यावर होणारा अन्याय मी कदापि सहन करणार नाही, आणि इथे राहून मी संशोधन करून एम.एस्सी. होणारच.' असे ठामपणे सांगितले. रामन यांनी कमलाबाईंच्या हट्टास्तव त्यांना एका वर्षासाठी प्रवेश दिला. मग वर्षभर कमलाबाईंनी बायोकेमिस्ट्री या विषयाचा झपाटून अभ्यास केला. वर्षअखेर रामन त्यांना म्हणाले. तुमची निष्ठा आणि चिकाटी पाहून असे वाटते की, यापुढे संस्थेत फक्त मुलींनाच प्रवेश द्यावा.'

### सन्मान

लीग ऑफ नेशन्समध्ये भारत, इंग्लंड व अमेरिका या तिन्ही देशांच्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व, (लक्झेंबर्ग), १९३८, राष्ट्रपती पदक प्राप्त., भारतीय विज्ञान संस्था, बेंगलोर, भारत : दुधातील व कडधान्यांतील प्रथिनांचे पृथक्करण. ह्युमनायझेशन ऑफ बफेलो मिल्क. सर विल्यम डन इन्स्टिटच्यूट ओफ़ बायोकेमिस्ट्री, केंब्रिज, इंग्लंड : वनस्पतीमध्ये 'सायटोक्रोम'चा शोध. या शोधाबद्दल केंब्रिज विद्यापीठाने पीएच.डी. पदवी दिली. आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ जगतात नाव झाले. न्यूट्रिशन रिसर्च लॅब, कुन्नूर, भारत : तोसला यीस्ट जीवनसत्त्व 'प'चा शोध. भारतीय विज्ञान संस्था, मुंबई, भारतः कडधान्यांमधील ट्रिप्सीन इनहिबिटस. आरे दूध कॉलनीतील दूध, गुरांचे गवत. वासरांचा आहार, धान आट्यातील पौष्टिक घटक, नीरा या पेयातील उपयुक्त घटक, त्यांचे माणसांवर परिणाम. नीरा संशोधनाबद्दल त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट संशोधनाबद्दलचे राष्ट्रपती पारितोषिक मिळाले.

### मार्गदर्शक म्हणून काम

या सर्व संशोधनांत सहभागी होणाऱ्या त्यांच्या २५ विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाकडून एम.एस्सी. व १७ विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी मिळाली. १९६९ मध्ये निवृत्त झाल्यावर स्वयंपाकघरात तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांवर संशोधन करून डॉ. कमलाबाई सोहोनींनी अनेक लेख लिहिले. त्यांचे एक पुस्तक आहार-गाथा या नावाने प्रसिद्ध झाले आहे.

### शिक्षण

एम.एस्सी.(मुंबई भारत)१९३७, पीएच.डी. (केंब्रिज इंग्लंड) १९३९,सत्यवती लल्लूभाई सामळदास शिष्यवृत्ती, १९३१, टेक्निकल रिसर्च स्कॉलरशिप, बॉंबे प्रेसिडेन्सी, १९३३, स्पिंगर रिसर्च स्कॉलरशिप, १९३७, सर मंगळदास नथूभाई फ़ॉरिन एज्युकेशन स्कॉलरशिप, १९३७, इन्टरनॅशनल फ़ेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी विमेन (अमेरिकेची संयुक्त संस्थाने)ची ट्राव्हेलिंग स्कॉलरशिप, १९३८.

पुढे १९३७ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या 'स्प्रिंगर रिसर्च' आणि 'सर मंगलदास नथूभाई' या शिष्यवृत्त्या मिळवून कमला सोहोनी इंग्लंडला गेल्या. तिथे केंब्रिजमधील जगप्रसिद्ध सर विल्यम डन लॅबॉरेटरीचे डायरेक्टर, नोबेल पारितोषिकविजेते सर फ्रेड्रिक गॉलन्ड हॉपकिन्स यांना भेटून, संस्थेत प्रवेश देण्याची विनंती केली. त्यावर त्यांनी 'माझ्या प्रयोगशाळेतील सर्व जागा भरल्या आहेत, तुलाच जागा मोकळी दिसली तर सांग' असे सांगितले. कुणाचीच ओळख नसल्याने बाई हताश झाल्या, तेव्हाच तेथील एक शास्त्रज्ञ डॉक्टर रिक्टर यांनी त्यांना आपली जागा देऊ केली. दिवसा त्या जागेवर, सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत बाई काम करीत, आणि रात्री डॉ. रिक्टर. पहिले सत्र संपायला केवळ दोन-तीन दिवस बाकी असताना कमलाबाईंनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला आणि 'प्राणिमात्रांप्रमाणे सर्व वनस्पतीतीलही साऱ्या जीवनक्रिया 'सायटोक्रोन-सी'च्या मध्यस्थीने एन्झाइम्समुळे होतात, हे मूलभूत महत्त्वाचे संशोधन सादर करून १९३९ साली केंब्रिज विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी संपादन केली. इतरांचे प्रबंध हजार-पंधराशे पानांचे असताना, कमलाबाईंचा प्रबंध अवघ्या ४० पानांचा होता आणि तो त्यांनी त्यावेळी एका व्याख्यानाद्वारे सभागृहापुढे ठेवला.

त्यानंतर अनेक शास्त्रज्ञाच्या आग्रहाला बळी पडून पुढील संशोधनासाठी इंग्लंडमध्ये न राहाता, डॉ. कमलाबाई मायभूमीच्या प्रेमाने भारतात परत आल्या. दिल्लीच्या 'लेडी हार्डिंग्ज कॉलेज' व पुढे मुंबईच्या (रॉयल) इन्स्टिटच्यूट ऑफ़ सायन्स' या संस्थेत त्यांनी काम केले. मुंबईच्या याच संस्थेच्या निदेशक म्हणून त्या निवृत्त झाल्या. 'लेडी हार्डिंग्ज कॉलेजमधली जीवरसायनशास्त्राच्या प्राध्यापकाची त्यांची नोकरी, डॉ. हॉपकिन्स यांच्या सूचनेनुसार १९३८ सालापासून कमलाबाईंकरिता राखून ठेवण्यात आली होती. इंग्लंडहून आल्यावर १९३९ मध्ये, सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात त्या आपल्या नोकरीवर रूजू झाल्या.

## दिन विशेष

### भारताच्या स्वातंत्र्यानंतरही गोवा 14 वर्ष होते पोर्तुगीजांच्या ताब्यात!




१८ जून हा दरवर्षी गोवा क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. इ.स. १९४६ मध्ये या दिवशी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी गोव्यातील लोकांना पोर्तुगीजांच्या विरोधात बोलण्याची प्रेरणा दिली. १८ जून हा दिवस गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. १८ जून १९४६ रोजी डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्यातील जनतेला पोर्तुगीज राजवटीविरुद्ध संघटित होऊन लढा देण्याचा संदेश दिला. यादिवशी झालेल्या क्रांतीच्या जोरदार वक्तृत्वाने स्वातंत्र्यलढ्याला बळ दिले आणि पुढे केले. पोर्तुगीजांच्या विरोधात येथे मोठे जनमत होते. पोर्तुगीजांनी पाच वेळा गोवा इन्क्विझिशन द्वारे प्रचंड अत्याचार येथील हिंदू जनतेवर केले आणि हिंदूंचा छळ केला. अखेरीस, १९ डिसेंबर १९६१ रोजी, भारतीय सैन्याने गोव्यावर आक्रमण केले, हा भाग पोर्तुगीज राजवटीपासून मुक्त केला आणि गोवा भारताला जोडला. त्यामुळे दरवर्षी गोव्यातील लोकं १९ डिसेंबर हा गोवा मुक्ती दिन म्हणून साजरा करतात.

गोवा क्रांती दिन हा गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात महत्त्वाचा दिवस आहे, जो दरवर्षी १८ जून रोजी साजरा केला जातो. १८ जून १९४६ रोजी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी मडगाव येथे पोर्तुगीज राजवटीविरुद्ध ऐतिहासिक लढा पुकारत जनतेला संघटित केले होते. २२ मे १४९८ रोजी वास्को-द-गामा भारतात आल्यापासून गोव्यावर पोर्तुगीजांचे राज्य होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला असला, तरी गोव्याला पोर्तुगीजांच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी आणखी १४ वर्षे संघर्ष करावा लागला. थोर समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया आणि त्यांचे सहकारी डॉ. ज्युलियाओ मिनेझिस यांनी गोव्यातील जनमानसात जागृती निर्माण करण्याचे ठरवले.पोर्तुगीज सरकारने गोव्यात सार्वजनिक सभांवर कडक बंदी घातली होती. या बंदीला आव्हान देत, १८ जून १९४६ रोजी डॉ. लोहिया यांनी मडगाव येथील सभेमध्ये हजारो गोमंतकीयांसमोर भाषण केले.त्यांनी पोर्तुगीजांच्या दडपशाहीविरोधात जनतेला 'मोकळेपणाने विचार करा, मोकळेपणाने बोला, मोकळेपणाने लिहा' असा संदेश दिला. महत्त्वच्या घटनेमुळे गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याला एक नवीन दिशा मिळाली आणि देशभरातून गोवा मुक्ती आंदोलनाला बळ मिळाले. याच क्रांतीची परिणती म्हणून अखेर १९ डिसेंबर १९६१ रोजी भारतीय लष्कराने पोर्तुगीजांचा पराभव करून गोव्याला पूर्णपणे स्वतंत्र केले. या दिवसाचे स्मरण म्हणून दरवर्षी १८ जून रोजी गोव्यातील आझाद मैदान (पणजी) आणि लोहिया मैदान (मडगाव) येथे विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी स्वातंत्र्यसैनिकांना शासकीय पातळीवर आदरांजली वाहिली जाते.हेमंत

# इतिहासातील प्रसिद्ध वॉटर्लूची लढाई!

वॉटर्लूची लढाई ही १८ जून, इ.स. १८१५ रोजी तत्कालीन नेदरलँड्सच्या संघटित राजतंत्रातील वॉटर्लू येथे (वर्तमान बेल्जियम) झालेली लढाई होती. या लढाईत ब्रिटन, हॉलंड, बेल्जियम, प्रशिया यांचा समावेश असलेल्या नेपोलियन विरोधी ७ व्या युतीच्या सैन्याने फ्रेंच सम्राट नेपोलियन यांच्या नेतृत्वाखालील फ्रेंच साम्राज्याच्या सैन्याचा निर्णायक पराभव केला.

१८१५ मध्ये नेपोलियन एल्बा येथुन नजरकैदेतून सुटून पुन्हा पॅरिसला आला व आपले साम्राज्य पुनःप्रस्थापित करण्याच्या उद्योगाला लागला. त्याने आपले मोठे सैन्य पुन्हा एकत्र केले व आपल्या जुन्या शत्रुंविरुद्ध आघाडी उघडली. हॉलंड, प्रशिया, बेल्जियम व युनायटेड किंग्डम यांनी देखिल प्रत्युतर म्हणून नेपोलियन विरुद्ध संयुक्त आघाडी उघडली. या आघाडीचे नेतृत्व जनरल आर्थर वेलस्ली कडे देण्यात आले. व १८ जून १८१५ रोजी वॉटर्लु येथे दोन्ही फौजा एकमेकांना भिडल्या. वेलस्लीने पारंपरिक व्यूहरचना केलेली होती. आसपासच्या प्रदेशाची टेहळणी करून त्याने आपल्या सैन्याचा मुक्काम हा एका टेकडीच्या उतारावर ठोकला. तेथून त्याने आपले सैन्य नेपोलियनच्या सैन्याला आडवे घातले व लढण्यास भाग पाडले. नेपोलियनला या व्यूहातील आपला गैरफायदा माहिती होता परंतु अधिक वेळ काढला असता मागून चालून येणारे प्रशियन सैन्य व ब्रिटिश या दोघांशी लढणे अधिकच कठीण गेले असते. असे असता त्याने वेलस्लीवर चाल केली. सुरुवातीला वेलस्लीने बचावाचे घोरण स्वीकारले व पर्शियन सैन्य येईपर्यंत



वेळकाढूपणा अवलंबला. दरम्यान फ्रेंच सैन्याच्या अनेक चाली ब्रिटिश सैन्याने परतवून लावल्या. सरतेशेवटी नेपोलियनने आपले इंपिरियल गार्ड ब्रिटिशांवर घातले परंतु ते देखील फसले. नेपोलियनने आपली सगळी हुकमी पाने वापरलेली पाहून वेलेस्लीने आता आपले सैन्य आक्रमक पवित्र्यात आणले व तो फ्रेंचांवर चाल करून गेला. काही वेळातच फ्रेंच सैन्याला पराभव स्पष्ट होऊ लागला व त्यांनी तेथून काढता पाय घेण्यास सुरू केले.


## लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला

### ई–निविदा सुचना क्र.02 सन 2026–27

जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथील जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा क्र.०१ बांधकाम करणे मौजे निंबी मालोकार ता. अकोला या कामाचे निविदा प्रक्रिया हि जलसंपदा विभाग शा. नि. दिनांक. १८/१०/२०२३ व दिनांक ०१/०८/२०२५ जलसंधारण विभाग शा.नि. ०३/०१/२०२३ ग्रामविकास विभाग शा.नि. दिनांक २३/०९/२०१३ व दिनांक ०८/१०/२०२१ च्या अनुषंगाने राबविण्यांत येत आहे. ई- निविदा प्रक्रिया मधुन योग्य त्या प्रवर्गा कडून खुल्या ऑनलाईन ई निविदा मागविण्यांत येत आहेत. सदर ई निविदा सुचना क्र.०२ सन २०२६-२०२७ दिनांक. १७ जुन २०२६ रोजी सविस्तरपणे खालील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

Main Portal-https://mahatenders.gov.in

**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**लघुपाटबंधारे विभाग,**
**जिल्हा परिषद, अकोला**

**अतिरिक्त मुख्य कार्यकारी**
**अधिकारी,**
**जिल्हा परिषद, अकोला**


# व्यायाम करताना व झाल्यावर काय काळजी घ्यावी?

उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी व्यायाम करावा की टाळावा, हा अनेकांना पडणारा प्रश्न आहे. आधुनिक वैद्यकीय शास्त्रानुसार नियमित व्यायाम रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतो. मात्र, अनियंत्रित रक्तदाब असताना किंवा हृदयविकाराचा धोका असल्यास अतितीव्र व्यायाम हृदयावर अतिरिक्त ताण निर्माण करू शकतो. चालणे, मध्यम स्वरूपाचा कार्डिओ आणि नियंत्रित स्ट्रेंथ ट्रेनिंग हे हायपरटेन्शन असलेल्या व्यक्तींसाठी सुरक्षित पर्याय मानले जातात. योग्य वॉर्म-अप, हायड्रेशन, कूल-डाउन आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यायाम केल्यास हृदयाचे आरोग्य दीर्घकाळ चांगले राहण्यास मदत होते.

उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींना पूर्वीच्या काळी नेहमी 'आराम करा' किंवा जड शारीरिक कष्टाची कामे टाळा असा सल्ला दिला जायचा. परंतु, आधुनिक वैद्यकीय विज्ञानानुसार, नियमित व्यायाम हा रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा आणि हृदयाचे आरोग्य राखण्याचा विना-औषधाचा एक सर्वोत्तम मार्ग आहे. असे असले तरी, आजच्या काळात एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो: खूप जास्त तीव्रतेचा किंवा हेवी व्यायाम उच्च



रक्तदाब असलेल्या रुग्णांच्या हृदयाला इजा पोहोचवू शकतो का? याचे उत्तर प्रत्येक व्यक्तीचा रक्तदाब किती नियंत्रणात आहे, त्यांच्या हृदयाचे एकंदरीत आरोग्य कसे आहे, त्यांची शारीरिक क्षमता किती आहे आणि ते कोणत्या प्रकारचा व्यायाम करतात यावर अवलंबून असते.

जेव्हा आपण व्यायाम करतो, तेव्हा स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा करण्यासाठी आपले हृदय अधिक वेगाने आणि ताकदीने काम करू लागते. यामुळे व्यायामादरम्यान तात्पुरत्या स्वरूपात रक्तदाब वाढणे ही एक सामान्य आणि नैसर्गिक प्रक्रिया आहे. निरोगी व्यक्तींसाठी ही बाब फायदेशीर ठरते. परंतु, ज्या व्यक्तींचा रक्तदाब अनियंत्रित आहे किंवा ज्यांना आधीपासूनच हृदयाचे काही छुपे आजार आहेत, त्यांनी अचानक अति-तीव्रतेचा किंवा जड व्यायाम केल्यास त्यांच्या हृदय व रक्तवाहिन्यांवर अवाजवी ताण पडतो. यामुळे हृदयविकाराशी संबंधित गंभीर वैद्यकीय गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो. याचा अर्थ असा नाही की व्यायाम करणे बंद करावे, तर व्यायामाची तीव्रता नियंत्रित असणे गरजेचे आहे. नियमित आणि मध्यम स्वरूपाच्या व्यायामामुळे विश्रांतीच्या वेळचा रक्तदाब कमी होतो, रक्ताभिसरण सुधारते, हृदय मजबूत होते आणि पर्यायाने हार्ट अटॅक किंवा स्ट्रोकचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.


## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला

### ई–निविदा सुचना ०६/ २०२६–२०२७

जावक क्रमांक ३७२६/ ईनिसु-०६/निलि/ २०२६ / दिनांक १/०६/२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम, कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र.१ ते ३ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच अंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदे स्पर्धे मध्ये भाग घेवू शकेल. निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रूपये) |
|---|---|---|
| १ | अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील एनएच ते म्हैसपूर प्रजिमा- २८ कि.मी.०/०० ते ३/५०० पर्यत रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे (रा.म.मा.१६१ एक कान्हेरी पासून साहित पर्यंत)' | ३८८४२०७१ |
| २ | अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील म्हैसांग रामगांव दहिगांव गावंडे अन्वी मिर्झापूर बोरगांव मंजू रस्ता प्रजिमा- १२ कि.मी.३/०० ते ४/०० व ४/५०० ते ६/०० मध्ये सुधारणा करणे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे ३/८०० (रा.म.२८० म्हैसांगपासून रामगांव आणि रा.म. २८४ कासमपूर पासून रा.म.मा.५३ बोरगांव पर्यंत) | २२७३३७५० |
| ३ | अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील अकोला आपातापा म्हैसांग रस्ता रा.मा. २८०किमी ७/२०० मध्ये पूलाचे बांधकाम करणे (अकोला पासून म्हैसांग पर्यत आणि लाखपुरी पासून बल्लारखेड पर्यत आणि कवठा खोलापूर पासून आसरा पर्यंत आणि भातकुली पासून अमरावती कु-हा पुलागांव पर्यत रामा २८०) | १९५८५२४० |

**अटी व शर्ती :-** १ सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. २- ई-निविदा काम क्र.१ ते ३ कामांची ई-निविदा दिनांक १७.०६.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक २४.०६.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सवमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक २९.०६.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे) ३- वरील काम क्रं.१ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १८/०६/२०२६ वेळ १२.०० वा. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे आयोजित करण्यात येईल. ४. वरील काम क्रं. २ ते ३ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १८/०६/२०२६ वेळ १२.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे आयोजित करण्यात येईल. ५. वरील काम क्रं. ०१ ते ०३ कामांची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील. ६- खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in ७- ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत. ८. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही. तसेच निधी उपलब्ध झाल्यानुसार देयके अदा करण्यांत येतील. ९. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
**कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग अकोला**

## नगरसेवक सतीश जयस्वाल यांच्या पाठपुराव्याला यश

**तेल्हारा :** नगर परिषद क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना अंगणवाडी सेवांचा लाभ मिळावा यासाठी नगरसेवक सतीश जयस्वाल यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. यामुळे आता नगर परिषद क्षेत्रातील सर्व पात्र लाभार्थ्यांना अंगणवाडीमार्फत दिल्या जाणाऱ्या विविध योजनांचा व सेवांचा लाभ घेता येणार आहे. यापूर्वी नगर परिषद क्षेत्रातील अनेक नागरिकांना अंगणवाडी सेवांपासून वंचित राहावे लागत होते. या समस्येची दखल घेत नगरसेवक सतीश जयस्वाल यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करून लाभार्थ्यांच्या अडचणी मांडल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे आता नगर परिषद क्षेत्रातील गर्भवती माता, स्तनदा माता, ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके तसेच किशोरी मुलींना अंगणवाडी सेवांचा लाभ उपलब्ध होणार आहे.

# अतिक्रमण कारवाईत दुजाभावाचा आरोप

## रस्ते, चौक आणि नाल्यांवरील अतिक्रमण हटवण्याची मागणी

वि.प्रतिनिधी १७ जून

**अकोट :** शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेचे नागरिकांकडून स्वागत होत असले तरी अनेक भागांमध्ये अद्यापही अतिक्रमणे कायम असल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. काही ठिकाणी अतिक्रमणे हटविली जात असताना इतर ठिकाणी मात्र ती जशीच्या तशी राहिल्याने कारवाईत दुजाभाव होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी हातगाड्या, फळ विक्रेते तसेच विविध प्रकारची अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अनेकदा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. विशेष म्हणजे वाहतूक विस्कळीत झाल्यानंतरही काही फळ विक्रेते व हातगाडीधारक आपली गाडी बाजूला करण्यास तयार नसल्याचे चित्र वारंवार पाहायला मिळत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या मते, अतिक्रमण हटाव मोहीम केवळ दिखाऊ किंवा औपचारिक न राहता शहरातील सर्व भागांत समान निकषांवर आणि सातत्याने राबविणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी रहदारीची मोठी समस्या निर्माण होत आहे, तेथे विशेष मोहीम राबवून अतिक्रमणे हटविण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, पावसाळा तोंडावर आला असताना नाल्यांवरील अतिक्रमणांचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी नाल्यांवर अतिक्रमणे झाल्याने नालेसफाईच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी पावसाचे पाणी साचण्याचा आणि शहरातील काही भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी नालेसफाईस अडथळा ठरणारी अतिक्रमणे आहेत, ती तातडीने हटवून मान्सूनपूर्व नालेसफाईचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शहराच्या सुयोग्य वाहतुकीसाठी, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि पावसाळ्यातील संभाव्य संकट टाळण्यासाठी प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## सिंधी कँप भागात अतिक्रमण हटाव मोहिम

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने बुधवारी आपला मोर्चा सिंधी कँप भागात वळवला. रस्त्यावर लावलेल्या पान टप-या तसेच अस्थायी दुकाने हटवली. सकाळ पासूनच पथक या परिसरात सक्रिय झाले होते.

सिंधी कँप परिसर गजबजलेला आहे. तसेच हा मार्ग अतिशय वर्दळीचा आहे. त्यामुळे रस्ता मोकळा राहणे आवश्यक आहे. शहरात सध्या अतिक्रमण हटाव मोहीम दररोज राबविण्यात येत आहे. काही भागात नागरिक स्वतःहून अतिक्रमण काढत आहेत तर काही ठिकाणी क्षुल्लक वाद देखील होत आहेत. जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण काढले जात आहे. शहर सौंदर्यीकरण तसेच वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने मुख्य रस्ते अतिक्रमण मुक्त असणे आवश्यक आहे. त्यामुळे या मोहिमेला देखील महत्त्व आहे.

## मोहम्मद अली रोड - तेलीपुरा रोडवरील अतिक्रमण साफ

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** अकोला शहरातील मोहम्मद अली रोड आणि तेलीपुरा रोड परिसरात महानगरपालिकेने मोठी अतिक्रमण हटाव कारवाई केली आहे. महानगरपालिकेच्या पथकाने पोलिस बंदोबस्तात कारवाई करत रस्त्यांवरील अतिक्रमण हटवले. या कारवाईमुळे परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



अकोला शहरातील गजबजलेल्या मोहम्मद अली रोड आणि तेलीपुरा रोड परिसरात महानगरपालिकेने अतिक्रमणा विरोधात धडक कारवाई केली. अनेक दिवसांपासून रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, शेड, साहित्य तसेच इतर अडथळ्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत होती. महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने पोलिसांच्या मदतीने विशेष मोहीम राबवत रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवली. कारवाईदरम्यान काही ठिकाणी अनधिकृतरित्या रस्त्यावर ठेवण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले तर काही अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात आली. या कारवाईमुळे मोहम्मद अली रोड आणि तेलीपुरा रोडवरील रस्ते मोकळे झाले असून वाहनचालक, व्यापारी आणिनागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत निर्माण होणारी वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## नोटीस न देता महापालिकेकडून दुकानावर कारवाई

### न्यायालयीन वाद सुरू असतानाही दुकान पाडल्याचा आरोप

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** शहरातील गांधी चौक परिसरात ९ जून २०२६ रोजी महापालिकेकडून कारवाई करत बिपिन भैयालाल मिरज़ामले यांचे दुकान पूर्णपणे पाडण्यात आले. संबंधित कुटुंबाचा आरोप आहे की, या कारवाईपूर्वी त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती.

संबंधित जागेबाबत दुकानधारकांकडे कर पावत्या, स्थायी समितीचा ठराव, नगररचनाकारांची टिप्पणी, वीजपुरवठ्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र तसेच टिनशेड उभारण्याची परवानगी यांसारखी कागदपत्रे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.

यापूर्वी २०१४ मध्येही याच दुकानावर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेले असून आजही न्यायालयीन वाद प्रलंबित असल्याचा दावा संबंधितांनी केला आहे. दुकानधारकांच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना आणि विविध शासकीय कागदपत्रे उपलब्ध असतानाही कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे त्यांचा अनेक वर्षांचा व्यवसाय उद्ध्वस्त झाला असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी महापालिकेची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, न्यायालयीन वाद सुरू असताना करण्यात आलेल्या या कारवाईबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

## सिंहस्थ गुरु दोषामुळे अकोल्यात नोव्हेंबरपासून शुभ कार्ये नाहीत, पुरोहित संघाचा निर्णय

### 23 जानेवारी 2027 पर्यंत विवाह, वास्तूपूजन वर्ज्य

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी देवगुरु बृहस्पतीचा सिंह राशीत प्रवेश होत असल्याने अकोला शहरात 'सिंहस्थ गुरु दोष' लागणार आहे. या दोषामुळे नोव्हेंबर २०२६ पासून २३ जानेवारी २०२७ पर्यंत विवाह, वास्तूपूजन, भूमीपूजन, नवीन कामांचा शुभारंभ, मुंडन, यज्ञोपवीत व व्रत उद्यापन यांसारखी सर्व शुभ कार्ये वर्ज्य राहणार असल्याचा निर्णय अकोला पुरोहित संघाने घेतला आहे.



श्री बालाजी मंदिरात पार पडलेल्या पुरोहित संघाच्या सभेत गोदावरी नदीचा नकाशा, मुहूर्त चिंतामणि, धर्म सिंधु, निर्णय सिंधु तसेच महाराष्ट्रीयन, सम्राट व निर्णय सागर पंचांगांचा आधार घेऊन हा निर्णय घेण्यात आला. सभेत सांगण्यात आले की, या कालावधीत नक्षत्र पंचपाद व गुरु नवमांशाचा विशेष दोष राहील. त्यामुळे २३ जानेवारी २०२७ नंतरच शुभ कार्ये करावीत. दरम्यान, २०२६-२७ मध्ये नाशिक येथे कुंभमेळा होणार आहे. सिंहस्थ गुरु दोषाचे नियम मलमास व गुरु-शुक्र अस्ताप्रमाणे पाळले जातात. मात्र वेगवेगळ्या गावांसाठी व राज्यांसाठी हे नियम बदलू शकतात, असेही पुरोहित संघाने स्पष्ट केले. आधुनिक ज्योतिषशास्त्राचे काही जाणकार सिंह राशीतील गुरु दोष मानत नाहीत, असेही सभेत नमूद करण्यात आले.

सभेला पं. रमेश अडीचवाल, रतन तिवारी, नरेंद्र पंचारिया, लाला तिवारी, राजूभाई जाडा, प्रमोद तिवारी, श्याम सुंदर अवस्थी, आलोक शर्मा, सुमित तिवारी, भैरव शर्मा, सुरेश सिवाल व पं. रवि कुमार शर्मा आदी पुरोहित उपस्थित होते.

## शासकीय आयटीआय अकोला प्रवेश अर्जाची अंतिम मुदत २१ जून

प्रतिनिधी १७जून




**अकोला :** स्थानिक रतनलाल प्लॉट स्थित सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयटीआय प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला असून प्रवेश अर्ज दाखल करण्याची अंतिम दिनांक ही २१ जून रोजी आहे. प्रवेश निश्चिती २२जून पर्यंत सुरू राहील.

अधिकाधिक संख्येने प्रवेश इच्छुक दहावी उत्तीर्ण उमेदवारांनी अर्ज दाखल करावे.आणि आयटीआय मध्ये येऊन ते निश्चित करावे. असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंखे यांनी केलेले आहे. संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख अरविंद पोहरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज दाखल करून तो संस्थेमध्ये येऊन निश्चित करावा आणि मग नंतर विविध अभियांत्रिकी तथा बिगर अभियांत्रिकी ट्रेड निवडून तशी ऑप्शन फॉर्म भरावी. याबद्दलची माहिती संस्थेमध्ये उपलब्ध आहे.

संस्थेचे प्रवेश प्रमुख विनोद पायघन यांनी दिलेल्या माहितीनुसार इच्छुक उमेदवारांचा दरवर्षी प्रमाणे उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद लाभत आहे.विविध अभियांत्रिकी तथा बिगर अभियांत्रिकी व्यवसायांच्या एकूण ८८८ जागा उपलब्ध आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अकोला येथे प्रवेश याकरिता अधिकाधिक प्रवेश इच्छुक दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याकरता विविध समित्या कार्यरत आहेत.



महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त राजपूत समाजाच्या वतीने शहरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. महाराणा प्रतापसिंह यांना मानवंदना दिली. युवकांनी रॅली काढली होती. महाराणा प्रतापसिंह यांचा जयजयकार करण्यात आला. महाराणा प्रताप बागेतील त्यांच्या पुतळ्याजवळ बुधवारी सकाळी आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे यांनी महाराणा प्रतापसिंह यांना मानवंदना दिली. राजपूत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री. आदिनाथ जैन श्वेतांबर मंदिर वर्धापनदिन उत्साहाने साजरा

प्रतिनिधी १७जून



**अकोला :** गांधी चौकातील श्री. आदिनाथ जैन श्वेतांबर मदिराने १२२ वे वर्ष पूर्ण करून १२३ व्या वर्षांत जेष्ठ शुक्ल २, १६/६/२०२६ रोजी पदार्पण केले. सकाळ पासून उत्सव प्रमाणे सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडत आहे. जैन मान्यते नुसार १०० वर्ष पूर्ण झालेले मंदिर हे तीर्थ म्हणून गणल्या जाते. आणि याच कारणामुळे कार्यक्रम खुप उत्साहाने, आनंदाने आणि भक्तीमय रीत्या पार पाडली जातात.

सकाळी वर्धमान डुप्लेक्स, खोलेश्वर येथुन 'नवीन ध्वज' वाजत गाजत गांधी चौक येथील मंदिरात आला. तदनंतर पूजन करुन नविन ध्वज मंदिर शिखरावर शास्त्रोक्त मंत्राचार च्या घोषात चढवण्यात आला. याच्या नतर दिड तासांचे विधीवत पुजन करुन सकल श्री संघ यांचे स्वामी वात्सल्य (प्रसादी भोजन) करुन कार्यक्रम ची सांगता झाली.

या वेळी प्रथम तीर्थंकर श्री आदेश्वर भगवान च्या मुर्ती ची देखनी, विलोभनीय आणि सुंदर सजावट 'जिनराज आंगी ग्रुप' च्या सौ. प्रियंका जैन, सौ. अवनी विशाल शाह, सौ. प्रियंका बेदमुथा आणि नैत्री हरीया या श्राविका यांनी केली. या प्रसंगी अकोला सकल जैन संघ यांनी उत्साहाने पुर्ण कार्यक्रम मध्ये भाग घेतला.

## जखमी माकडाला पकडण्याचा प्रयत्न फसला



**हिवरखेड :** येथील विकास मैदान परिसरात १७, जूनच्या सकाळी एका माकडाला अचानक शॉक लागल्याने ते माकड वरून खाली पडले व त्या माकडाला बघण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली इतर माकड सुद्धा त्याला नेण्यासाठी धावपड करीत होते, परंतु ते माकड भितीपोटी सैरावैरा पळत होते, या घटनेची माहिती स्थानिक पशु प्रेमी रवी गावंडे, अर्जुन खिरोडकार यांनी वनविभागाचे आर, एफ ओ राऊत, आंबेकर, शिंदे, कटीयांर यांना देण्यात आली, त्यांनी कर्मचारी सोमत रजाने, दीपक मेश्री, यांना माकडाला पकडण्यासाठी पाठविले यांच्यासह गावातील पशुवैद्यकी कर्मचारी राजेश वायकर, अन्सार खा, पवन म भड, अन्सारखा जबीखा, वनकर यांनी जखमी माकडाला उपचार करण्यासाठी पकडण्याचा बराच प्रयत्न केला , परंतु प्रयत्न फसला माकड पकडण्यास अपयश आले.

## आलेगाव परिक्षेत्रात कारवाई, वनतस्करांचे धाबे दणाणले

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** आलेगाव वनपरिक्षेत्रांतर्गत झरंडी नियतक्षेत्रतील राखीव वन क्षेत्रात नियमित गस्तीदरम्यान वनरक्षक यांना कुऱ्हाडीसह सागवान वृक्षांची चौकट घेऊन आरोपी दिसून आले. सदर आरोपीला वन विभागाने ताब्यात घेतले आहे.

आलेगाव वन परिक्षेत्रात झरंडी क्षेत्रात वन कर्मचारी गस्त करीत असतांना त्यांना वसाली येथील बबन हरिसिंग जाधव हा इसम सागवाणाची तस्करी करत असताना आढळून आला, या वेळी सदर आरोपीला वन विभागाने ताब्यात घेतले आहे. या दरम्यात पुढील तपासादरम्यान संबंधित व्यक्तीच्या राहत्या घराची तपासणी करण्यात आली असता त्याच्या घरातून अवैध सागवान वनमाल व सागवान चौकटी आढळून आले. सदर मालाबाबत कोणतीही वैध कागदपत्रे त्याच्या कडे न आढल्याने सदरचा वनमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियमानुसार वनगुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. जप्त वनमालाचे मूल्यांकन करण्यात येत आहे.सदर कारवाई आलेगाव वन परिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांचा मार्गदर्शनात वनपाल श्री. एन. एम. नाकाडे व वन कर्मचाऱ्यांनी केली.वनसंपत्तीचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी असून वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड, वनमाल वाहतूक किंवा साठवणूक याबाबतची माहिती नागरिकांनी वन विभागास कळवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# हिवरखेडची कृषी प्रक्रिया सहकारी संस्था अवसायनात

प्रतिनिधी १७जून

**हिवरखेड :** कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेला वेळोवेळी सूचना व संधी देऊनही संस्थेने पंचवार्षिक निवडणूक घेणेबाबत कसूर केला.तसेच मा. सहाय्यक निबंधक यांनी वारंवार सूचित करूनही प्रारूप मतदार याद्या कार्यालयास सादर केल्या नाहीत तसेच कार्यालयाकडील उपविधी दुरुस्तीबाबतच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून संस्थेने लेखा परीक्षण करून घेतले नाही. संस्थेने नियमानुसार कामकाज करणे बंद केले असून संस्थेचे संचालक व सभासद यांना सदरहू संस्था चालविन्यात स्वारस्य राहिले नसल्यामुळे संस्था अवसायनात काढण्यात आल्याचे समजते.



एकेकाळी हिवरखेडचे माजी आमदार डॉ. का.शा. तिडके यांनी आजच्या काळात कोट्यावधी रुपये किंमत असलेले स्वमालकीचे शेत शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी व हितासाठी दिले होते व त्यांच्या काळात या संस्थेने नेत्रदीपक प्रगती केली होती. त्यानंतर श्री एकनाथजी तिडके यांनी सुद्धा या संस्थेला प्रगतीथावर नेले होते. नंतरच्या काळात मात्र हळूहळू वैयक्तिक स्वार्थ व वर्चस्व अबाधित ठेवण्याच्या इर्षेतून संस्था डबघाईला आली व आवसायनात गेली. पण हाय वे टच करोडो रुपयाची ही मालमत्ता डोळ्यासमोर ठेवून व पुढील आर्थिक लाभ लक्षात घेऊन काही अतिमहत्वाकांक्षी भागधारकांनी काही लोकांना हाताशी धरून ही संस्था पुनर्जीवीत केली. अर्थात या गोष्टीची कल्पना भागधारकांना नव्हती. सहकार क्षेत्र जणूकाही आपल्याच मुठीत आहे या अविर्भावात २९/९/२०२५ रोजी संस्था अवसायनात काढण्याबाबत मा. सहाय्यक निबंधक यांनी पाठवलेल्या अवसायनपूर्व नोटीसला निर्धारित तारखेच्या आत खुलासा सादर करण्याचे सूचित केले होते पण त्या आदेशाकडे सुद्धा संचालकांनी दुर्लक्ष करत खुलासा सादर केला नाही. या सर्व बाबी लक्षात घेता मा. सहाय्यक निबंधक तेल्हारा यांनी दि. ५/६/२०२६ रोजी कृषी प्रक्रिया संस्था हिवरखेड र. न. ११३ अवसायनात काढण्यात येत असल्याचे आदेश देत श्री. एम. के. विखे यांची अवसायक म्हणून नियुक्ती करण्याचा आदेश काढला असल्याचे समजते.

या संस्थेची भागधारकांना कुठलीही माहिती न देता गुपचूप निवडणूक लावून घेण्याचा प्रयत्न संस्थेचा एक भागधारक करत असल्याचे तसेच आपल्या जवळच्या मोजक्या मय्यत भागधारकांचे शेअर्स बदलवून त्यांच्या जागी त्यांच्या कुटुंबातील इतर व्यक्तीच्या नावे शेअर्स केले असल्याची व हे सर्व करत असतांना इतर मयत भागधारकांच्या वारसाना या गोष्टीची कुठलीही कल्पना न देता, आमसभा न घेता आपल्या वतीचे भागधारक वाढविले असल्याची हिवरखेड व परिसरात चर्चा आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर, अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार

मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १७ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## टाकळी पुलाजवळील जीवघेणा खड्डा; तातडीने दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी १७ जून

**पाटणबोरी** : येथून पाटणकडे जाणाऱ्या मार्गावरील टाकळी पुलाजवळ मोठा जीवघेणा खड्डा पडल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या खड्ड्यात अनेक चारचाकी वाहने अडकली असून दुचाकी व ऑटोचेही अपघात झाले आहेत. याबाबत वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही संबंधित विभागाकडून केवळ तात्पुरती दुरुस्ती करण्यात आल्याने खड्डा पुन्हा पूर्ववत झाला आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालकांना टायर पंचर होणे, वाहने अडकणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वणी, चंद्रपूर आणि आदिलाबादला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर रेती वाहतूक करणारी तसेच मुकुटबन परिसरातील जड ओव्हरलोड वाहने मोठ्या प्रमाणात धावतात.

त्यामुळे खड्ड्याचा आकार वाढत आहे. पावसाळ्यात मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# जिल्ह्याला मिळणार 89 नवे केंद्रप्रमुख; पीएच.डी., नेट-सेटधारक शिक्षकांची नियुक्ती होणार

### शिक्षण गुणवत्तेला मिळणार चालना; समुपदेशनानंतर लवकरच आदेश

प्रतिनिधी १७ जून

**यवतमाळ** : जिल्हा परिषद शाळांमधील अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या केंद्रप्रमुख पदांची भरती अखेर अंतिम टप्प्यात पोहोचली असून जिल्ह्याला लवकरच ८९ नवे केंद्रप्रमुख मिळणार आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच ही प्रक्रिया पूर्ण होत असल्याने शाळांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजाला बळ मिळणार आहे.

राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'समूह साधन केंद्र समन्वयक तथा केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५' मध्ये जिल्ह्यातील सुमारे अडीच हजार शिक्षक सहभागी झाले होते. ३ व ४ फेब्रुवारी रोजी सहा सत्रांत ऑनलाइन पद्धतीने झालेल्या परीक्षेचा निकाल १३ मार्च रोजी जाहीर करण्यात आला होता.

जिल्ह्यातील ८९ रिक्त पदांसाठी अडीचपट प्रमाणात सुमारे ३०० पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी बुधवारी वसंतराव नाईक जिल्हा परिषद सभागृहात पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या सूचनेनुसार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा यांच्या नियंत्रणात सहा स्वतंत्र चमूंमार्फत ही प्रक्रिया राबविण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातील ८५ आणि दिव्यांग प्रवर्गातील ४ अशा एकूण ८९ पदांसाठी उमेदवारांना पडताळणीसाठी बोलाविण्यात आले होते. बहुतांश उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली असून अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. आता समुपदेशन प्रक्रियेनंतर नियुक्ती आदेश जारी होण्याची शक्यता आहे. केंद्रप्रमुख हे शाळा आणि शिक्षण प्रशासन यांमधील महत्त्वाचा दुवा मानले जातात. शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, शिक्षकांना मार्गदर्शन, शाळांची देखरेख, विविध शैक्षणिक उपक्रमांची अंमलबजावणी आणि नियोजन या जबाबदाऱ्या केंद्रप्रमुखांवर असतात. त्यामुळे दीर्घकाळ रिक्त राहिलेली पदे भरली जात असल्याने शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

#### गुणवंत शिक्षकांची केंद्रप्रमुखपदी निवड

■ या भरती प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे उच्च शैक्षणिक पात्रता असलेल्या शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर निवड झाली आहे. नव्या केंद्रप्रमुखांमध्ये ३ पीएच.डी. धारक, ७ नेट उत्तीर्ण, ११ सेट उत्तीर्ण, २ पीएच.डी. संशोधन फेलो तसेच १ राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते शिक्षक यांचा समावेश आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या शिक्षण व्यवस्थेला संशोधनवृत्तीचे, अनुभवी आणि नेतृत्वक्षम अधिकारी मिळणार आहेत. दरम्यान, केंद्रप्रमुख पदोन्नतीमुळे रिक्त होणाऱ्या शिक्षकांच्या जागांचा समावेश पवित्र पोर्टलवर करण्यात येणार असल्याने पात्र बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच अनेक वर्षांपासून अतिरिक्त जबाबदारी सांभाळणाऱ्या प्रभारी केंद्रप्रमुखांनाही या प्रक्रियेमुळे दिलासा मिळणार आहे.



## एफडीएची धाड; प्रतिबंधित गुटखा जप्त, आरोपी फरार

प्रतिनिधी १७ जून

**महागाव** : अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने महागाव शहरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये छापा टाकून प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला. या कारवाईत २६ हजार ६९४ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधित आरोपी घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक १७ येथील शेख सद्दाम यांच्या निवासस्थानी बुधवारी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास एफडीए व पोलिसांच्या पथकाने धाड टाकली. मात्र, कारवाईची चाहूल लागताच शेख सद्दाम यांनी तेथून पळ काढल्याचे सांगण्यात येत आहे.

छाप्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पथकाने तो जप्त करून पंचनामा केला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या कारवाईनंतर महागाव शहरात एकच खळबळ उडाली. कारवाईच्या पार्श्वभूमीवर अनेक हॉटेल्स, किराणा दुकाने तसेच पानटपऱ्यांनी दिवसभर दुकाने बंद ठेवली. त्यामुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले होते.

एफडीएचे अधिकारी अमितकुमार उपलाप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पोलिसांच्या सहकार्याने करण्यात आली.

फरार आरोपीचा शोध सुरू असून या धाडीमुळे गुटखा विक्रेते आणि तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

## महागाव नगरपंचायतीत 'टक्केवारीचे राजकारण'; काँग्रेसचे शैलेश कोपरकर यांचा गंभीर आरोप

प्रतिनिधी १७ जून

**महागाव** : महागाव नगरपंचायतीतील सत्ताधारी पदाधिकारी आणि नगराध्यक्षांच्या पतीच्या कथित हस्तक्षेपामुळे शहरातील विकासकामे ठप्प झाली असून नगरपंचायतीचा कारभार जनहितापेक्षा 'टक्केवारीच्या राजकारणा'भोवती फिरत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश कोपरकर यांनी केला आहे.

शहरातील रखडलेली विकासकामे, प्रलंबित प्रश्न आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नगरपंचायतीत विकासकामांपेक्षा टक्केवारीला अधिक महत्त्व दिले जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.



कोपरकर यांच्या म्हणण्यानुसार, रस्ते, नाल्या, पिण्याच्या पाण्याच्या योजना, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित अनेक कामांना मंजुरी मिळूनही त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. काही कामे मंजूर असूनही ती जाणीवपूर्वक रखडवली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. नगरपंचायतीचा कारभार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धर्तीवर चालविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी नगराध्यक्षांच्या पती तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दीपक आडे यांचे नाव घेत प्रशासकीय कामकाजात त्यांच्या कथित हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील मर्यादा पाळल्या गेल्या पाहिजेत; मात्र काही व्यक्ती निर्णय प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेप करत असल्याने प्रशासनावर दबाव निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

महागाव कृषी उत्पन्न बाजार समितीची आर्थिक आणि प्रशासकीय स्थिती आधीच अत्यंत बिकट असून ती 'व्हेंटिलेटर'वर असल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत त्या कारभाराची पुनरावृत्ती नगरपंचायतीत होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांची असल्याचे कोपरकर यांनी सांगितले.

तसेच नगरपंचायत कार्यालयात विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि प्रशासकीय कामांसाठी नागरिकांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असल्याचा आरोपही त्यांनी केला. नागरिकांना वेळेत सेवा मिळण्याऐवजी आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे ते म्हणाले.

या कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. शहराच्या विकासासाठी आलेला निधी पारदर्शकपणे खर्च व्हावा, विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण व्हावीत आणि नागरिकांच्या कराच्या पैशांचा योग्य वापर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. आपण केलेल्या आरोपांबाबत आवश्यकतेनुसार संबंधित यंत्रणांसमोर पुरावे सादर करण्यास तयार असल्याचेही कोपरकर यांनी स्पष्ट केले. नगरपंचायतीतील कथित गैरप्रकार, हस्तक्षेप आणि टक्केवारीच्या राजकारणाची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांमुळे महागावच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून संबंधितांकडून यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## आर्णीत मोफत नेत्रतपासणी शिबिर

प्रतिनिधी १७ जून

**आर्णी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्णी येथे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आर्णी, महात्मे हॉस्पिटल, नागपूर आणि अंजली डायग्नोस्टिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.

"८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण" या भूमिकेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेना दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणून यंदा हे नेत्र आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती मनसेचे उपजिल्हाध्यक्ष सचिन येलगंधेवार आणि शहराध्यक्ष कपिल ठाकरे यांनी दिली. हे शिबिर १९ जून रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेदरम्यान अंजली कॉर्नर, जाधव पेट्रोल पंप परिसर, आर्णी येथे होणार आहे.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्रतपासणी करण्यात येणार असून मोतीबिंदूग्रस्त रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात येईल. तसेच गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वितरणही करण्यात येणार आहे.

शहर व तालुक्यातील नागरिकांनी या मोफत आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सामाजिक बांधिलकी जपत उभी केली रोजगारनिर्मितीची चळवळ : संजय गावंडे

प्रतिनिधी १७ जून

**आर्णी** : व्यवसायातील यशासोबतच समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणारे आर्णीतील सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक संजय गावंडे यांनी रोजगारनिर्मिती, शेतकरी कल्याण आणि समाजसेवेच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेले पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेळी-मेंढी संगोपन केंद्र ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.



या केंद्रामुळे अनेक बेरोजगार युवक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देण्याचे कार्यही केंद्रामार्फत सातत्याने केले जात आहे.

शेळी-मेंढी पालनातून तयार होणारे सेंद्रिय खत परिसरातील शेतकऱ्यांना मोफत देण्याचा उपक्रम गावंडे यांनी हाती घेतला आहे. रासायनिक खतांच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होत आहे. सेंद्रिय शेतीला चालना मिळावी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, या उद्देशातून हा उपक्रम राबविला जात आहे.

शेतकऱ्यांच्या विविध अडचणी समजून घेत त्यांना शक्य ती मदत करण्यासाठी गावंडे नेहमीच पुढाकार घेतात. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना निर्माण झाली आहे. सामाजिक कार्याच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. गरजू, गरीब आणि संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी ते सातत्याने कार्यरत असतात. समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे त्यांची ओळख केवळ यशस्वी व्यापारी म्हणून नव्हे, तर संवेदनशील समाजसेवक म्हणूनही निर्माण झाली आहे.

स्पर्धा आणि स्वार्थाला प्राधान्य मिळत असलेल्या काळात रोजगारनिर्मिती, शेतकरी हित आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधणारे संजय गावंडे यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या उपक्रमांमुळे आर्णी तालुक्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाला नवी दिशा मिळत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## तहसीलमधील सुविधा केंद्राची अचानक तपासणी

प्रतिनिधी १७ जून

**आर्णी** : तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रामार्फत शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी गंगाधर होवाळे यांनी सोमवारी अचानक भेट देत केंद्राची सखोल तपासणी केली. या तपासणीमुळे तहसील कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली.

उपविभागीय अधिकाऱ्यांनी सेतू केंद्रातील विविध दाखल्यांच्या शुल्काबाबतची कागदपत्रे, पावत्या, नोंदवही व इतर अभिलेखांची बारकाईने पडताळणी केली. यावेळी केंद्रावर उपस्थित असलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्याकडून आकारण्यात आलेल्या शुल्काची माहिती जाणून घेतली. काही नागरिकांनी सेवा मिळविताना येणाऱ्या अडचणींबाबतही अधिकाऱ्यांना माहिती दिली. शासनाने विविध दाखल्यांसाठी निश्चित शुल्क ठरवून दिले असून त्यापेक्षा अधिक रक्कम आकारल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. नागरिकांना पारदर्शक व वेळेत सेवा मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तपासणीदरम्यान सेतू केंद्रातील कामकाज, अर्ज निकाली काढण्याचा कालावधी, शुल्क आकारणीची प्रक्रिया तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचीही पाहणी करण्यात आली. प्रशासनाच्या या अचानक कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून अशा तपासण्या नियमितपणे व्हाव्यात, अशी मागणी केली आहे.

## माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन भोवले; सेवानिवृत्त विस्तार अधिकाऱ्यास २५ हजारांचा दंड

### अमरावती माहिती आयुक्तांचा आदेश; उमरखेड पंचायत समितीतील प्रकरण

प्रतिनिधी १७ जून

**उमरखेड** : माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत मागविलेली माहिती वेळेत न देता कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी उमरखेड पंचायत समितीचे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी के. पी. सोनटक्के यांना सेवानिवृत्तीनंतर २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हा आदेश अमरावती विभागाचे माहिती आयुक्त यांनी दिला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते तथा पत्रकार दिगांबर मनवर यांनी माहितीचा अधिकार कायद्यानुसार पंचायत समितीअंतर्गत विविध बाबींची माहिती मागितली होती. मात्र, विहित मुदतीत माहिती न देता जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. यानंतर मनवर यांनी माहिती आयुक्तांकडे दाद मागितली.

या प्रकरणाची सुनावणी माहिती आयुक्त, अमरावती यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीनंतर तत्कालीन जनमाहिती अधिकारी के. पी. सोनटक्के यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश देण्यात आले. ही रक्कम दरमहा ५ हजार रुपये कपात करून माहिती आयुक्त कार्यालयाच्या लेखाशीर्षाखाली जमा करण्याचे तसेच त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंजाब रणमले यांना अर्जदारास एका आठवड्याच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. माहिती न दिल्यास प्रतिदिन २५० रुपये किंवा कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंड का आकारण्यात येऊ नये, याबाबत पुढील सुनावणीदरम्यान लेखी खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी आयोगाच्या आदेशानुसार अर्जदारास माहिती मिळाली की नाही, याचा आढावा घेतला नसल्याचे निरीक्षण नोंदवत त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी का करण्यात येऊ नये, याबाबतही पुढील सुनावणीत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे माहिती अधिकार कायद्याचे पालन न करणाऱ्या शासकीय कार्यालयांमध्ये खळबळ उडाली असून माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासनाला स्पष्ट संदेश मिळाल्याची चर्चा आहे.

#### माहितीसाठी पाच वर्षांचा संघर्ष

■ पत्रकार तथा माहिती अधिकार कार्यकर्ते दिगांबर मनवर यांनी सन २०२० मध्ये पंचायत समिती उमरखेड येथे माहिती मिळविण्यासाठी नियमानुसार अर्ज दाखल केला होता. मात्र, तत्कालीन व विद्यमान जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी माहिती देण्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला. अखेर त्यांनी माहिती आयुक्तांकडे धाव घेतली. तब्बल पाच वर्षांच्या पाठपुराव्यानंतर या प्रकरणात आदेश प्राप्त झाल्याने त्यांच्या संघर्षाला यश मिळाले आहे.

## उमरखेडला ५७.२५ कोटींची नवी न्यायालयीन इमारत; ११ कोर्ट हॉल्सची सुविधा

प्रतिनिधी १७ जून

**उमरखेड** : उमरखेड तालुक्यातील न्यायव्यवस्था अधिक सक्षम आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्र शासनाने नवीन न्यायालयीन इमारतीसाठी ५७ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. तळमजला अधिक दोन मजले अशा स्वरूपाच्या या इमारतीत ११ अत्याधुनिक कोर्ट हॉल्स उभारण्यात येणार आहेत.

उच्च न्यायालय, मुंबई यांनी उमरखेड येथे अतिरिक्त न्यायालयीन इमारत उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्यानुसार शासनाने या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली २१ मे २०२६ रोजी झालेल्या उच्चाधिकार सचिव समितीच्या बैठकीत या प्रकल्पास हिरवा कंदील देण्यात आला.

नवीन न्यायालयीन इमारत पूर्ण झाल्यानंतर उमरखेड तालुक्यासह परिसरातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. विशेषतः तालुक्याच्या दुर्गम भागातील नागरिक, पक्षकार आणि वकील बांधवांना याचा मोठा लाभ होणार आहे. न्यायप्रक्रिया अधिक गतिमान, सोयीस्कर आणि प्रभावी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे. गेल्या काही वर्षांत उमरखेड शहरात पोलिस ठाणे, पोलिस वसाहत, पोस्ट कार्यालय, प्रशासकीय इमारत, उपजिल्हा रुग्णालय, विश्रामगृह, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, बसस्थानक सुशोभीकरण, पशुवैद्यकीय दवाखाना आणि जगदंबा देवी टेकडी सुशोभीकरण यांसारखे विविध विकास प्रकल्प राबविण्यात आले आहेत. त्यात आता न्यायालयीन इमारतीची भर पडली आहे. भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले. अत्याधुनिक न्यायालयीन इमारतीमुळे पक्षकार आणि वकील बांधवांना मोठी सुविधा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी आमदार नामदेवराव ससाने यांनीही या प्रकल्पासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केल्याचा दावा केला आहे.

न्यायालयीन इमारतीसाठी जागा उपलब्ध करून देणे, जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया मार्गी लावणे तसेच दिवाणी न्यायालय स्तर-१ मंजूर करून आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. या नव्या न्यायालयीन इमारतीमुळे उमरखेडच्या विकासाला नवी चालना मिळणार असून न्यायव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे.

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. १७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# फ्रेझरपुरा हद्दीत अवैध दारू जप्त



**अमरावती :** १६/०६/२०२६ रोजी पोस्टे फ्रेजरपुरा हद्दी मध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरून आरोपी अनिता मनोज बेनिवाल वय ४७ वर्ष, रा परिहारपुरा ,वडाळी अमरावती ह्या राहत्या घरासमोरील आवारात हात भट्टी दारू काढताना मिळून आल्या वरून त्यांच्याकडून हात भट्टी दारू १०० लिटर व मोहाचा सडवा २०० लिटर आणि इतर साहित्य जागीच नष्ट केले.असा एकूण ८०,००० रु मुद्दे माल जप्त करण्यात आला असून त्यांचे विरुद्ध पो.स्टे.फ्रेजरपूरा येथे कलम ६५(क)(फ)(ड) म.दा.का. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# अवैध दारू विरोधात राज्य उत्पादन शुल्क विभाग ॲक्शन मोडवर !

## अमरावती विभाग : 590 गुन्हे दाखल, 66 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १७ जून

**अमरावती :** पुणे जिल्ह्यात घडलेल्या मिथेनॉल मिश्रित विषारी दारू सेवन दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, राज्य उत्पादन शुल्क विभागाने अमरावती विभागात हातभट्टी दारू निर्मिती, वाहतूक आणि विक्री विरोधात धडक मोहीम राबवली आहे. विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख आणि सह आयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या निर्देशानुसार ही विशेष मोहीम राबवण्यात आली.

अमरावती विभागाचे उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम जिल्ह्यांचे अधीक्षक आणि विभागीय भरारी पथकाने २९ मे ते १४ जून या कालावधीत ही कारवाई केली. या मोहिमे दरम्यान संपूर्ण विभागात एकूण ५९० गुन्हे नोंदवून ५४४ आरोपींना अटक करण्यात आली असून ६६ लाख ३६ हजार ११५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती विभागी उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे. याशिवाय, विभागीय भरारी पथकाने (वि.भ.प.) ३९ गुन्हे नोंदवून २४ आरोपींना अटक केली आणि ९६.०२ ब.लि. देशी दारू, ३०७ ब.लि. हातभट्टी दारू, १०,१८५ ब.लि. रसायन व १ वाहनासह ५ लाख ५१ हजार २२५ रुपयांच्या मुद्देमालावर कारवाई केली. या संपूर्ण मोहिमेत पाचही जिल्हे आणि भरारी पथक मिळून एकूण १,१९६.९ ब.लि. देशी दारू, १०,३६१.०६ ब.लि. हातभट्टी दारू, १,१०,६८६ ब.लि. रसायन आणि १२ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

या विशेष मोहिमेत विभागीय उपायुक्त डॉ. पराग नवलकर यांनी स्वतः प्रत्यक्ष मैदानात उतरून कारवाईत सहभाग घेतला. ३१ मे आणि १ जून रोजी अमरावतीचे अधीक्षक शशिकांत गर्जे, विभागीय भरारी पथकाचा स्टाफ आणि कुऱ्हा पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी मिळून मोठी कारवाई केली.



### अशी करण्यात आली जिल्हानिहाय कारवाई

**अमरावती जिल्हा :** अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक १७९ गुन्हे नोंदवून १७३ आरोपींना अटक करण्यात आली; तसेच १५६ वारस गुन्ह्यांची नोंद करत १८८.६४ ब.लि. देशी दारू, ४,०५९.०६ ब.लि. हातभट्टी दारू आणि २१,८१५ ब.लि. रसायन जप्त करण्यात आले असून ६ वाहनांसह एकूण १६ लाख ९३ हजार ८९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**अकोला जिल्हा :** जिल्ह्यात ८३ गुन्हे नोंदवून ८५ आरोपींना अटक करण्यात आली, ज्यात ३९७.७० ब.लि. देशी दारू, ३४० ब.लि. हातभट्टी दारू, ४,३२४ ब.लि. रसायन आणि ३ वाहनांसह ६ लाख २४ हजार ७९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

**यवतमाळ जिल्हा :** जिल्ह्यात १२८ गुन्हे नोंदवून ११२ आरोपींना अटक करण्यात आली; तसेच १४३.९९ ब.लि. देशी दारू, १,३२७ ब.लि. हातभट्टी दारू आणि ३२,२६० ब.लि. रसायनासह १५ लाख ६ हजार २९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**बुलढाणा जिल्हा :** जिल्ह्यात ११० गुन्हे नोंदवून १०८ आरोपींना गजाआड करण्यात आले, तसेच ३०६.६७ ब.लि. देशी दारू, ३,७८८ ब.लि. हातभट्टी दारू, २५,०७२ ब.लि. रसायन आणि १ वाहनासह १४ लाख ६८ हजार ४४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**वाशिम जिल्हा :** जिल्ह्यात ५१ गुन्हे नोंदवून ४२ आरोपींना अटक करण्यात आली, ज्यात ६३.८८ ब.लि. देशी दारू, १,३२७ ब.लि. हातभट्टी दारू, १७,०३० ब.लि. रसायन आणि १ वाहनासह ७ लाख ९१ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती विभागाच्या पाचही जिल्ह्यांमध्ये हातभट्टी गावठी दारूविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये २९ मे ते १४ जून या कालावधीत राबविललेल्या विशेष मोहिमेत ५९० गुन्हे दाखल करण्यात आले असून ६६ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यापुढेही विभागात कोणत्याही अवैध धंद्यांना थारा दिला जाणार नाही आणि अशा कृत्यांवर कठोर कारवाई केली जाईल. दारु निर्मिती, विक्री व वाहतुकी संदर्भात माहिती असल्यास तत्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संपर्क साधावा.

**डॉ. पराग नवलकर,**
विभागीय उप आयुक्त

# राजापेठ व भुतेश्वर चौक ते रविनगर परिसरात प्लास्टिक जप्ती आणि डस्टबिन तपासणी मोहीम



**अमरावती :** अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार आणि वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव तसेच सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर झोन क्र. २ यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि. १६ जून २०२६ रोजी राजापेठ व भुतेश्वर चौक ते रविनगर परिसरात प्लास्टिक जप्ती आणि डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २२ व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीवेळी काही ठिकाणी कापडी व कागदी पिशव्यांचा तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिकचा वापर आढळून आला. मात्र, दोन आस्थापनांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

यामध्ये प्रथमेश बुक डेपो अँड जनरल यांच्याकडून ५,००० आणि श्री स्वीट्स अँड जनरल यांच्याकडून ५,००० असा एकूण १०,००० दंड वसूल करण्यात आला. तसेच डस्टबिन नियमांचे पालन न केल्याप्रकरणी हरियाणा स्पेशल जलेबी यांना १,०००, अर्णव बुक डेपो यांना १,००० आणि अकरम खान अकबर खान यांना ५०० दंड आकारण्यात आला.

या विशेष मोहिमेत एकूण १२,५०० इतका दंड वसूल करण्यात आला. नागरिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ्य निरीक्षक धनीराम कलोसे, मिथुन उसरे, सचिन सैनी, मिथुन वाघमारे, पवन चावरे, अजिंक्य जवंजाळ, शक्ती पिवाल आणि योगेश कंडारे यांनी सहभाग घेतला.

# गुन्हे शाखा शहरने आव्हानात्मक खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला ताब्यात घेतले; नागपुरीगेट परिसरातील क्लिष्ट प्रकरण

प्रतिनिधी १७ जून



**अमरावती :** गुन्हे शाखा, अमरावती शहर यांचेकडून अतिशय क्लिष्ट स्वरुपाचा व आव्हानात्मक खुनाच्या गुन्हातील आरोपी निष्पन्न करुन ताब्यात घेतले आहे. दिनांक १३/०५/२०२६ रोजी पो.स्टे. नागपूरी गेट परिसरात वजीर पटेल यांचे बंद दवाखान्याचे छतावर पाण्याच्या टाकीमध्ये एक अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह जिर्ण अवस्थेत मिळून आल्याने पोलीस स्टेशन नागपूरीगेट येथे अप.कं. २५८/२०२६ कलम १०३(१), २३८ बी.एन.एस. प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर मृतदेह हा जिर्ण अवस्थेत असल्याने मृतदेहाची ओळख पटविणे हे पोलीसांसमक्ष मोठे आव्हान होते. वरिष्ठ अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देवून गुन्हया संदर्भाने मार्गदर्शन करुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशीत केले होते. सदर मृतकची ओळख पटविण्यासाठी अमरावती शहर तसेच ग्रामीण हद्दीत मिसिंग पुरुष यांची माहिती मिळवून ओळख पटविण्याचे प्रयत्न केला असता पो.स्टे. नागपूरी गेट येथे दिनांक ३१/०३/२०२६ रोजी हलीमा बी अब्दुल अनीस, वय ६० वर्षे, रा. अलीम नगर यांचे तक्रारीवरुन अब्दुल रियाज अब्दुल अनिस हा घरुन निघून गेल्याने मिसिंग नोंद होती. पोलीसांचे अथक प्रयत्नाने डी.एन.ए. टेस्ट वरुन पो. स्टे. नागपूरी गेट इददीत वजीर पटेल यांचे बंद दवाखान्याचे छतावर पाण्याच्या टाकीमध्ये मिळालेला अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह हा अब्दुल रियाज अब्दुल अनिस रा. अलीम नगर, अमरावती याचाच असल्याचे सिध्द झाले. गुन्हा घडल्यापासून गुन्हे शाखा, अमरावती शहर हे गुन्हयाचा सातत्याने समांतर तपास करीत असतांना सदरचे गुन्हयामध्ये कोणत्याही प्रकारचा सुगावा नसतांना नमुद गुन्हा उघडकीस आणणे अतिशय आव्हानात्मक होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेच्या संपुर्ण पथकाने अहोरात्र मेहनत घेवून गुप्त बातमीदार, सी.सी.टि.व्ही. फुटेज तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे कौशल्यपुर्वक तपास करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला. नमुद गुन्हा उघडकीस आणण्याचे अनुषंगाने यातील आरोपी विरुध्द तपासा दरम्यान उघडकीस आलेली तथ्ये व तांत्रिक पुराव्याच्या आधारे नमुद आरोपीचा गुन्हयातील सहभाग उघड झाला असून नसरीन बानो हीने तिचा साथीदार शेख ईकराम शेख चांद याचे मदतीने तिचा पती अब्दुल रियाज अब्दूल अनिस यास त्याचे वडीलाच्या घरातून बोलावून त्याचा खून करुन त्याचा मृतदेह शेख ईकराम याचे ऑटोमध्ये नेवून वजीर पटेल यांचे बंद दवाखान्याचे छतावर पाण्याचे टाकीमध्ये टाकल्याची कबुली दिल्याने सदर गुन्हात आरोपी निष्पन्न करून पुढील कार्यवाही करीता दोन्ही आरोपीतांना पो.स्टे. नागपूरी गेट यांचे ताब्यात देण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी -मध्ये शेख ईकराम शेख चांद, वय २७ वर्षे, व्यवसाय- ड्रायव्हर, रा. नरुदुला मस्जिद जवळ, सहारा नगर, अमरावती ,नसरीन बानो अब्दुल रियाज, वय ३७ वर्षे, रा. अलकरीम नगर नं. २, अमरावती असे आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके सा. (परिमंडळ- ०१), रमेश धुमाळ, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), मा. सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) शिवाजी बचाटे, तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त, कैलाश फुंडकर सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. दिनेश दहातोंडे, अतुल वर, मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सपोनि महेश इंगोले, पो. उपनि. गजानन सोनुने, सहा. पोउपनि फिरोज खान, पोहवा सतीष देशमूख, पोहवा मंगेश लोखंडे, पो.हे.कॉ. संभाजी केन्द्रे, पो.हे.कॉ. नाझीमउददीन सैयद, पो.ना सचिन भोयर, पोलीस अमलदार रंजित गावंडे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, सागर ठाकरे चालक- चेतन शर्मा, शांतनु बारोटकर, गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी तसेच सायबर येथील स.पो.नि. अनिकेत कासार, पो.शि. चेतन गुल्हाने यांनी केलेली आहे.

## माडीवर झोपायला गेलेल्या इसमाचा खाली पडून मृत्यू

**अचलपूर :** शहरातील सुलतानपूर परिसरातील फैजपुरा भागात राहणाऱ्या एका तरुण मजुराचा छतावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतकाचे नाव विजय पंजाबराव गाडे (४०) असे असून ते हातमजुरी करून आपला उदरनिर्वाह करीत होते.

विजय गाडे यांना शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत एक खोली मिळाली होती. मात्र घरात पंखा किंवा कुलरनसल्याने उन्हाळ्याच्या उकाड्यात त्यांना घरात राहणे कठीण जात होते. त्यामुळे ते अनेकदा घराजवळील भाग्योदय हॉलच्या छतावर झोपण्यासाठी जात असत. सोमवारी रात्रीही ते

नेहमीप्रमाणे झोपण्यासाठी छतावर गेले होते. मंगळवारी सकाळी भाग्योदय हॉलजवळ ते खाली पडलेल्या अवस्थेत आढळून आले. नागरिकांच्या ही बाब निदर्शनास येताच घटनास्थळी गर्दी झाली. पाहणी केली असता गाडे यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, विजय गाडे हे नेमके कशा परिस्थितीत छतावरून खाली पडले, याची स्पष्टता नसून पोलीस तपासानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

# राजापेठ पोलीसांची अवैधरित्या विदेशी दारू घेवुन जाणाऱ्या इसमावर कार्यवाही

प्रतिनिधी १७ जून



**अमरावती :** राजापेठ पोलीसांनी अवैध्दरित्या विदेशी दारू घेवुन जाणा-या इसमावर कार्यवाही केली. पोलीस स्टेशन राजापेठचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन राजापेठ हददीत गुन्हेगार चॅकींग तसेच अवैध्दरित्या देशी/विदेशी दारू विकीसाठी घेवुन जाणा-यावर कार्यवाही करणे करीता आदेशीत केल्याने पोउपनी मिलींद हिवरे व डिबी स्टाफ सह दि. १६/०६/२०२६ चे १०. ०० वा. पासुन पेट्रोलींग करीत असतांना खात्री लायक बातमी मिळाली की, श्रि विकास कॉलनी, अमरावती येथुन एक इसम स्कुटी पेप गाडीवर अवैध्यरित्या विदेशी दारु घेवुन जात आहे.

अशा मिळालेल्या माहीती वरुन विकास कॉलनी, अमरावती येथे गेलो असता मिळालेल्या माहीतीप्रमाणे एक इसम हा त्याचेकडील टिव्हीएस स्कुटी पेप गाडी कमांक एम एच २७ ए व्ही ४२६४ यावर काहीतरी संशयास्पदरित्या घेवुन जाातांना दिसल्याने नमुद इसमाला पो स्टॉफच्या मदतीने थांबवुन त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रणीण ज्ञानेश्वर बगे, वय ५२ वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, अमरावती असे सांगीतले. वरून त्यांचे विरूध्द पो. स्टे. ला आणुन कलम ६५ (ई) महा. दारुबंदी कायदा अन्वये दाखल करण्यात आला. सदर प्रकणामध्ये आरोपी ०१) ०५ नग १८० एम एलची विदेशी दारू मॅजीक मोमेन्ट क्वॉर्टर ०२) ०४ नग २०० एमएलची विदेशी दारू ग्लेनवाक क्वॉर्टर ०३) ०५ नग २०० एम एलची विदेशी दारू बॅलेन टाईन क्वॉर्टर ०४) ०४ नग १८० एम एलची विदेशी दारू रॉयल स्टॉग बैरल क्वॉर्टर ०५) ०८ नग १८० एम एलची विदेशी दारू रॉयल स्टॉग क्वॉर्टर ०६) ०४ नग १८० एमएलची विदेशी दारू ब्लेन्डर प्राईड क्वॉर्टर असा १४,२५० रूचा माल व ०७) एक टिव्हीएस कंपनीची स्कुटी पेप गाडी कमांक एम एच २७ ए व्ही ४२६४ पर्पल रंगाची कि अं ३०,००० रूचा असा एकुण ४४,२५० रूचा माल मुददेमाल जप्त करण्यात आला

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि २ अमरावती, संजय खताळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, पोउपनी मिलींद हिवरे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवि लिखितकर, व पोका अंकुश काळे, पोका आकाश यादव, पोकों प्रशांत बेलोकार, पोका अर्जुन कदम यांनी केली.

# पेरणीच्या वेळी संतुलित अन्नद्रव्यांसाठी संयुक्त किंवा मिश्र खतांचा वापर करावा; कृषी विभागाचे आवाहन

## ◆खते, बी बियाणे औषधी खरेदी करताना पक्के बिल घेण्याचे फायदे कृषी विभागाने केले स्पष्ट

प्रतिनिधी १७ जून

**धारणी :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत रासायनिक खतांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मात्र, बहुतांश शेतकरी केवळ युरिया ॐ आणि डीएपी ॐ याच खतांची आणि ठराविक कंपन्यांच्या उत्पादनांची मागणी करत असल्याचे चित्र आहे. यामुळे बाजारात या खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी आणि जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी शेतकऱ्यांनी केवळ एकाच खताचा हट्ट न धरता, बाजारात उपलब्ध असलेल्या दर्जेदार पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.कृषी तज्ज्ञांच्या मते, पिकांच्या संतुलित वाढीसाठी जमिनीला नत्र, स्फुरद आणि पालाश या तिन्ही घटकांची गरज असते.

विशेषतः पेरणीच्या वेळी केवळ युरिया किंवा डीएपीचा वापर न करता, पिकाला सुरुवातीपासूनच संतुलित अन्नद्रव्ये मिळण्यासाठी संयुक्त किंवा मिश्र खतांचा वापर करणे अधिक फायदेशीर ठरते. केवळ युरिया आणि डीएपीच्या अतिवापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडून उत्पादकतेवर परिणाम होत आहे.

**'डीएपी' DAPला उत्तम पर्याय:** डीएपी (१८:४६:०) मधून पिकांना प्रामुख्याने नत्र आणि स्फुरद मिळते. या खताऐवजी जी शेतकरी खालील संयुक्त व मिश्र खतांचा वापर करू शकतात, ज्यामध्ये स्फुरदसोबतच



इतर आवश्यक घटकही योग्य प्रमाणात मिळतात: संयुक्त खते १०:२६:२६, १२:३२:१६, १४:३५:१४ किंवा २०:२०:०:१३ अमोनियम सल्फेट फॉस्फेट सल्फर .सिंगल सुपर फॉस्फेट एएझ्: डीएपीला 'सिंगल सुपर फॉस्फेट' एएझ् हा एक अत्यंत स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे. पेरणीच्या वेळी ३ पोती एसएसपी आणि १ पोते युरिया एकत्र करून वापरल्यास डीएपीपेक्षाही जास्त फायदा होतो. कारण यातून पिकाला स्फुरदसोबत गंधक एल्त्ज्प्ले आणि कॅल्शियम

हे महत्त्वाचे अन्नद्रव्य मोफत मिळतात. 'युरिया'ला(ॐ पर्याय आणि संतुलित वापर:नत्राची गरज भागवण्यासाठी पेरणीच्या वेळी केवळ पारंपरिक युरियावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी संयुक्त खतांना प्राधान्य द्यावे आणि पुढील आधुनिक पर्यायांचा विचार करावा नॅनो युरिया Nano Urer : पारंपरिक युरियाच्या गोण्यांपेक्षा नॅनो युरियाची द्रव बाटली अत्यंत प्रभावी आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेत याचा थेट फवारणीद्वारे वापर केल्यास खताचा अपव्यय टळतो आणि पिकाची वाढ जोमदार होते.

अमोनियम सल्फेट Ammoniumed Sulphate नत्रासोबतच यामध्ये २४ज्ञ् गंधक एल्त्ज्प्ले असल्याने तेलबिया आणि कडधान्य पिकांसाठी हे खत युरियापेक्षा उत्तम ठरते. बियाणे व रासायनिक खते खरेदी करताना शेतकऱ्यांनी घ्यावी विशेष काळजी; कृषी विभागाचे आवाहन खरीप हंगामाची लगबग सुरू झाली असून, बाजारपेठेत बियाणे, खते आणि कीटकनाशके खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी होऊ लागली आहे. मात्र, बाजारात वाढणारी गर्दी लक्षात घेता काही ठिकाणी बोगस, बनावट किंवा मुदत संपलेल्या निविष्ठांची विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शेतकऱ्यांनी खरेदी करताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करावेः**

१. पक्के बिल घेणे बंधनकारक

शेतकऱ्यांनी कोणत्याही कृषी सेवा केंद्रातून खरेदी केल्यानंतर कॅश मेमो किंवा पक्के जीएसटी उएऊ बिल आवर्जून घ्यावे. या बिलावर शेतकऱ्याचे नाव, बियाणेखताचे नाव, लॉट नंबर, बॅच नंबर, कंपनीचे नाव, वजन आणि किंमत स्पष्ट लिहिलेली असावी. बिलावर दुकानदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. २. पॅकिंग आणि सीलची तपासणी करावी

बियाण्यांची पिशवी किंवा खताचे पोते खरेदी करताना ते कुठेही फाटलेले किंवा शिवण उखडलेले नसावे. बियाण्यांच्या पाकिटावर उत्पादक कंपनीचा अधिकृत होलोग्राम किंवा'बारकोड' आहे की नाही, याची खात्री करा. ३.एक्सपायरी डेट अंतिम मुदत नक्की पहा विशेषतः कीटकनाशके किंवा जैविक खते खरेदी करताना त्यावर असणारी उत्पादनाची तारीखई्ॐ आणि अंतिम मुदतॅजेब् ॐ नक्की तपासावी. मुदत संपलेली उत्पादने पिकांवर प्रभावी ठरत नाहीत आणि त्यामुळे पैशांचे नुकसान होते.४. साहित्याची साठवणूक आणि रिकामी पाकिटे जपून ठेवा पेरणी झाल्यानंतर बियाण्याचे रिकामे पाकीट, थोडे शिल्लक राहिलेले बियाणे, टॅग आणि खरेदीचे बिल पीक हाती येईपर्यंत सुरक्षित ठिकाणी जपून ठेवावे. पिकाच्या उगवण क्षमतेत किंवा गुणवत्तेत काही दोष आढळल्यास कृषी विभागाकडे तक्रार करताना या वस्तू पुरावा म्हणून सादर कराव्या लागतात. फसवणूक झाल्यास येथे संपर्क कराः

शासनाने ठरवून दिलेल्या किमतीपेक्षा शैंझ् जास्त दराने विक्री केल्यास किंवा बोगस साहित्याची शंका आल्यास शेतकऱ्यांनी ङतालुका कृषी अधिकारी, कार्यालय किंवा कृषी विभाग पंचायत समिती येथे लेखी स्वरूपात तक्रार नोंदवावी. अनधिकृत किंवा पावती न देता विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

**कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला:** शेतकऱ्यांनी पेरणीच्या वेळी केवळ युरियावर भर न देता, पिकांच्या संतुलित पोषणासाठी संयुक्त किंवा मिश्र खतांचा वापर करावा. तसेच कोणत्याही एकाच विशिष्ट कंपनीच्या किंवा ब्रँडच्या खताचा आग्रह धरू नये. सर्व अधिकृत कंपन्यांच्या खतांमध्ये केंद्र शासनाच्या नियमानुसार सारखेच अन्नद्रव्य घटक असतात. बाजारात अनेक नामांकित कंपन्यांची संयुक्त खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा समतोल वापर करावा आणि खरेदी करताना अधिकृत विक्रेत्याकडून पक्के बिल नक्की घ्यावे.

**कामाजी ठोंबरे -**
कृषी अधिकारी तथा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, पंचायत समिती धारणी

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि १७ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com






# म्हणे, मी सांगतो तेथुन घ्या ट्रॅक्टर, चांगुलपणाचा ॲक्टर, वसुलीचा फॅक्टर!

## समाजकल्याण नव्हे 'कथित' अधिकाऱ्याचे स्वकल्याण, फक्त वसुलीवरच ध्यान

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने मिनी ट्रॅक्टर देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.परंतु येथील 'कथित' अधिकाऱ्याने त्याच्या दलालीच्या रक्कमेच्या हव्यासापोटी संगनमतात सहभागी असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या विक्रेत्याने मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून लालची अधिकाऱ्याला लाखो रूपयाचा मलिदा वाटल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. तर चांगुलपणाची ॲक्टिग करित वसुलीच्या फॅक्टर साठी मी सांगतो तेथुनच ट्रॅक्टर घेण्याची तोंडी अट टाकली आहे.

समाज कल्याण विभागामार्फत महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते. त्या योजना प्रभावीपणे राबवून बचत गटातील सर्व महिलांना फायदा व्हावा आणि त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता आहे.परंतु वाशीम येथील कार्यरत लालची अधिकाऱ्याने स्व-कल्याणासाठी वाशीम व परिसरातील विविध



कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रेत्यांना डावलून चक्क २५० किलोमीटर दूर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील 'मॅसे फर्ग्यूसन' कंपनीच्या विक्रेत्यासोबत संगनमत करून मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून स्वत:चे उखळ पांढरे करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या ट्रॅक्टर विक्रेत्याने एका मिनी ट्रॅक्टरची किंमत ३ लाख ८० हजार लावून लालची अधिकाऱ्याला एका ट्रॅक्टरमागे २५ ते ३० हजार रूपयाप्रमाणे लाखो रूपयाचे 'गिफ्ट' म्हणून दिल्याची समाजकल्याण विभागात चर्चा आहे.वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील पात्र असलेल्या महिला बचत गटाने त्यांच्या हिस्याची १० टक्के रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केल्याचे समजते.तसेच समाज कल्याण विभागाने सर्व महिला बचत गटाच्या खात्यामध्ये ९० टक्के रक्कमेतील ५० टक्के रक्कम जमा केल्याचे वृत्त आहे. आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मिनी ट्रॅक्टर बचत गटाला मिळाल्यानंतर त्यांच्या बचत खात्यात जमा होणार असल्याचे समजते. मिनी ट्रॅक्टर घेणाऱ्या महिला बचत गटाला छत्रपती संभाजीनगरला सेवा व दुरूस्तीसाठी ये-जा करणे सोयीचे नर्सेल्याने अमरावती विभागीच्या समाज कल्याण आयुक्तांनी 'हा' मिनी ट्रॅक्टर खरेदीचा लालची अधिकाऱ्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केलेला व्यवहार त्वरीत रद्द करून वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटांना न्याय द्यावा,दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी .अशी विविध स्तरातून मागणी होत आहे.

## थोडक्यात

### दत्तात्रय बंडेवार यांचे निधन

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●



संत निरंकारी मिशनचे प्रचारक तथा वाशीम ब्रॉन्चचे सेवादल संचालक दत्तात्रय बंडेवार यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले . मृत्युसमयी त्यांचे वय ७० वर्ष होते . दत्तात्रय बंडेवार यांनी आपला परिवार आणि नोकरी सांभाळतांना संपुर्ण वेळ निरंकारी मिशनचा प्रचार , प्रसार आणि सेवेमध्ये व्यतीत केला . त्यांच्या पश्चात पत्नी , मुलगा , सुन , दोन मुली , जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे . स्थानिक पद्मतिर्थ मोक्षधाम येथे आज १५ जून रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी निरंकारी मंडळाच्या परिवारासह समाजबांधव तथा विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती .

### सरकारने सरसकट शेतकरी कर्जमाफिचे आश्वासन पूर्ण करावे

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

'निवडणुकीपूर्वी 'सातबारा कोरा करू' अशी घोषणा देऊन शेतकऱ्यांची मते मिळवली आणि सत्तेत आल्यानंतर कर्जमाफीवर अटींचा डोंगर लादून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. ही शेतकऱ्यांची सरळसरळ फसवणूक असून सरकारने जनतेचा विश्वासघात केला आहे,' असा आरोप समनक जनता पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा शीतलताई राठोड यांनी दि. १६ जून रोजी निवेदनाद्वारे केला आहे .

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले की, आज राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.एल निनो चा परिणाम, दुष्काळ, नापिकी, वाढते उत्पादन खर्च आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकरी आधीच अडचणीत असताना सरकारने कर्जमाफीच्या नावाखाली केवळ घोषणाबाजी केली. प्रत्यक्ष लाभ देताना मात्र, इतक्या अटी लादल्या की हजारो गरजू शेतकरी योजनांपासून वंचितराहू शकतात.'जर सरकारची नीयत स्वच्छ होती, तर कर्जमाफी सर्व शेतकऱ्यांना बिनशर्त मिळाली असती. निवडणुकीत दिलेली आश्वासने केवळ मतांसाठी होती का? शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळ करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही,' असा सवालही शीतलताई राठोड यांनी उपस्थित केला. समनक जनता पार्टीने सरकारकडे सर्व अटी रद्द करून व्यापक आणि पारदर्शक कर्जमाफीची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे.

## अवैध सेतु, लुटण्याचा हेतु

### कारंजा येथील १९ तर मानोरा येथील ६ सेतू केंद्रावर कारवाई

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

महा सेवाकेंद्र
महा ई-सेवा केंद्र
सेतु

महाराष्ट्र शासनाने जेव्हापासून सर्व कामे ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून शेतू केंद्राला (ई सेवा केंद्र)विशेष महत्त्व प्राप्त झाले.त्यामुळे सेतु केंद्र चालवणाऱ्यांना एक मोठा व्यवसाय मिळाला.आणि त्यामुळे अवैध रित्या शेतू केंद्र चालवणाऱ्याचे प्रमाण ईमोठ्या प्रमाणावर वाढले. ग्रामीण भागातील सेतू धारकांनी आपले सेतू केंद्रा भाड्याने दुसऱ्याला कारंजा व मानोरा तहसील परिसरात चालवण्यासाठी दिली. या सर्व प्रकारांमुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लुट होत होती

सविस्तर माहिती अशी की,दिनांक ०५ जून २०२६ रोजी तहसील कार्यालय कारंजा परिसरातील निवासी नायब तहसिलदार अनिल वाडेकर व जिल्हा समन्वयक अधिकारी वाशिम येथील सौरभ जैन व महसूल सहाय्यक यांच्यासह संयुक्तपणे आकस्मिक तपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, तहसील कार्यालय परिसरामध्ये काही सेतू केंद्र चालविली जात आहेत,सदर सेतू केंद्राला मूळ मंजुरी ही ग्रामीण भागासाठी देण्यात आलेली आहे.सेतू केंद्रचालक आपल्या मूळ मंजूर ठिकाणी सेतू केंद्र न चालवता,तहसील कार्यालय परिसरामध्ये अवैध रित्या व अनधिकृतपणे हे केंद्र चालवत असल्याचे प्रत्यक्ष तपासणीत निष्पन्न झाले आहे.नियमानुसार ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुविधेसाठी मंजूर केलेले सेतू केंद्र शहरात किंवा तहसील परिसरात चालवणे हे शासकीय नियमांचे उल्लंघन, करत असून यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे. सेतू तपासणी मध्ये ग्रामपंचायत ५ व मूळ मालक १२ असे एकुण १७ आहे तरी सदर अनधिकृत केंद्रावर शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.व सदर सेतू केंद्राचा परवाना रद्द करण्यास हरकत नसल्याचे सांगण्यात आले. यामुळे ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरिकांचे होणारी गैरसोय व होणारी आर्थिक लुट थांबणार आहे.

## स्मार्ट मीटर बसविण्याची थांबवा सक्ती ...

# अन्यथा आंदोलनातुन उभी करु शक्ति!



काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजु चौधरी यांचा इशारा



शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे यांचा इशारा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील वीज ग्राहकांना मोठ्या प्रमाणात विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याबाबत संदेश पाठविण्यात येत आहेत. मात्र केवळ संदेश पाठवून नागरिकांना विश्वासात न घेता, पुरेशी माहिती न देता व प्रक्रिया स्पष्ट न करता मीटर बदलण्याची घाई सुरू आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करु नये, अशी मागणी वाशीम जिल्हा काँग्रेस अध्यक्ष तथा वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष राजू चौधरी यांनी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. एकीकडे ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरळीत मिळत नाही. रिडींग न घेता मनमानी वीज बिलाची आकारणी होत असतांना आता स्मार्ट मीटर सक्तीचे केले आहे. या विरोधात काँग्रेस व वीज ग्राहक संघटनांनी आक्रमक पवित्रा घेत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. निवेदन देतांना काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजू चौधरी यांच्यासह वीज ग्राहकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

वाशिम जिल्ह्यात महावितरण कंपनीमार्फत वीज ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसविण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत. स्मार्ट मीटर योजनेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम, शंका आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्राहकांची संमती व विश्वास न घेता ही प्रक्रिया राबविण्यात येत असल्याबद्दल शिवसेना, वाशिम जिल्हा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

यावेळी निवेदन देताना शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, जिल्हा संघटक गजाननराव देशमुख लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत सुर्वे नगरपरिषद गटनेते गजानन दहात्रे प्रभारी तालुकाप्रमुख गजानन जैताडे, तालुका संघटक संतोष सुर्वे भावेश गोरे रोहित बढेल गणेश गाभणे, गणेश इंगोले दिपक इढोळे, आनंदा काळे, अकिल भाई तेली ,फारुक भाई नरेंद्र भोयर, बबन ठाकरे,मनसिदर मोनी विनोद वारकड, संदिप खरटकर शिवानंद वाघमारे महेश शर्मा ज्ञानेश्वर जारे अक्षय वाघमारे नाना देशमुख इत्यादी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## लाखो निंबोळ्या, एकच संकल्प नैसर्गिक शेतीचा अवलंब !

### घोटा येथील संगमेश्वर शेतकरी गटाद्वारे निंबोळी अर्ख तयार करण्यात सुरुवात...





●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

झाडाखाली पडलेल्या निंबोळ्या म्हणजे कचरा नाही, तर शेतकऱ्यांसाठी खरं सोनंच आहे! या साध्या दिसणाऱ्या फळांमुळे महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांचे हजारो रुपये वाचत आहेत.

या निंबोळ्यांपासून तयार होणारे निंबोळी अर्क (नीमास्त्र) नैसर्गिक पद्धतीने कीड व्यवस्थापन करते आणि रासायनिक कीटकनाशकांवरील खर्च कमी करते. खरीप हंगाम तोंडावर आला असताना निंबोळी संकलनासाठी हाच सर्वात महत्त्वाचा काळ आहे.घोटा येथील संगमेश्वर शेतकरी गटाने पानी फाउंडेशनच्या 'फार्मर कप'मधून शिकलेला हा शास्त्रशुद्ध उपाय आता राज्यभरातील अनेक शेतकरी गट प्रत्यक्षात उतरवत आहेत. उत्साहाने राबवली जाणारी निंबोळी संकलन मोहीम केवळ खर्चात बचत नाही, तर निरोगी, शाश्वत शेतीकडे मजबूत वाटचाल आहे..

## वाशीममध्ये मान्सूनपूर्व पावसाची हजेरी

### उकाड्याने त्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला

●सिटी न्युज ब्युरो @ वाशिम●

आज वाशिम शहरासह तालुक्यात जोरदार पावसाचे आगमन झाले. वाढत्या उन्हाचा नागरिकांना फटका बसत असल्याने नागरिक त्रस्त झाले होते.मात्र आजच्या या पावसामुळे उकाडया पासून मोठा दिलासा मिळाला आहे.पुढे समाधान पाऊस झाल्यास शेतीच्या कामांना वेग येणार आहे.

वाशिम शहरासह तालुक्यातील अनेक भागात आज दुपारनंतर मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे उकाड्याने त्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले होते. मात्र, आज झालेल्या पावसामुळे



वातावरणात गारवा निर्माण झाला असून, नागरिकांनीही समाधान व्यक्त केले. पावसामुळे शेतकऱ्यांमध्येही आशेचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी दोन-तीन दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग येण्याची शक्यता आहे. सध्या शेतकरी मशागतीची कामे पूर्ण करून पावसाची प्रतीक्षा करत आहेत.

# अधिकाऱ्यांचे हप्त्याचे सुत्र, चाळणी झाले नदीपात्र

## एकावरही ठोस कारवाई नाही?, गौणखनिज माफियांवर कारवाई करून दाखवा! रिसोड तहसीलच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह?

● प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड●

रिसोड तालुक्यातील पैनगंगा, कांचन, उतावळी, खारोळ आदी नदीपात्रांमधून तसेच विविध गावांतील मुरूम खाणींमधून मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचा उपसा होत असल्याचे चित्र दिसत आहे. नदीपात्रांची अक्षरशः चाळणी होत असताना संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई होत नसल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक स्तरावर काही कर्मचाऱ्यांमार्फत महिन्याकाठी ठराविक हप्ते घेतले जात असल्याच्या चर्चेमुळेही संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळेच अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.





स्थानिक नागरिकांच्या मते, काही ठिकाणी केवळ नावापुरत्या कारवाया करून अवैध उत्खननावर अंकुश असल्याचा आभास निर्माण केला जातो. मात्र त्यानंतर पुन्हा त्याच जोमाने वाळू व मुरूम उपसा सुरू राहत असल्याचा आरोप केला जात आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये खोल खड्डे खोदून हजारो ब्रास मुरूम उपसण्यात आल्याचेही सांगितले जाते.विशेष म्हणजे, अवैध गौण खनिज वाहतूक करणारे टिप्पर व ट्रॅक्टर राजरोसपणे रस्त्यावर धावत असल्याचे चित्र असूनही मोठ्या कारवाया होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत शंका व्यक्त केली जात आहे. महसूल विभागाने वेळोवेळी काही कारवाया केल्याचा दावा केला असला तरी त्या कारवायांचा प्रत्यक्ष परिणाम दिसून येत नसल्याची चर्चा परिसरात आहे.गौण खनिज माफियांचा वाढता प्रभाव, नदीपात्रांचे होत असलेले नुकसान आणि पर्यावरणीय हानी यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. केवळ थातूरमातूर कारवाया न करता अवैध उत्खननाच्या मूळ सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.दरम्यान, मालेगाव तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात कठोर भूमिका घेऊन कारवाई करणारे तहसीलदार विक्रम मुंडे यांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीचा आदर्श रिसोडमध्येही राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. 'एक ठोस आणि निर्भीड कारवाई झाली तर गौण खनिज माफियांचे धाबे दणाणतील,' अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.आता महसूल प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे किती गांभीर्याने पाहते आणि अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात नेमकी कोणती पावले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### थातूरमातूर एकावर वार; हप्त्यापोटी इतरांना आधार?...

तालुक्यातील पैनगंगा, कांचन, उतावळी, खारोळ आदी नदीपात्रांमधून तसेच विविध ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू व मुरूम उपसा सुरू असल्याची चर्चा आहे. मात्र महसूल विभागाकडून एखाद्या वाहनावर किंवा ठिकाणी कारवाई करून केवळ दिखावा केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.अवैध उत्खनन आणि वाहतूक राजरोसपणे सुरू असतानाही मोठ्या माफियांवर ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. 'थातूरमातूर एकावर वार, हप्त्यापोटी इतरांना आधार' अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातून व्यक्त होत असून, अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची मागणी होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. १७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# विहिरीचा फर्मा घसरल्याने मजुराचा बुडून मृत्यू
## अखेर 13 तासानंतर मृतदेह बाहेर काढण्यात यश



प्रतिनिधी १७ जून

**खामगाव :** स्थानिक चिखली रोडवरील खासगी बाजार समितीच्या मागील नाल्यामध्ये खोदकाम केलेल्या विहिरीचे बांधकाम सुरु असतांना फर्मा घसरुन १६ जून रोजी मजुराचा मृत्यू झाला. परंतु त्याचा मृतदेह बाहेर काढण्यासाठी पाणी उपसण्यास होणारा विलंब पाहून ग्रामस्थांमध्ये रोष निर्माण झाला. त्यामुळे त्यांनी प्रथम शिवाजी नगर व नंतर शहर पोस्टे गाठून ठिय्या देण्यास सुरुवात करताच यंत्रणा जागी झाल्याने पाणी उपसण्यासाठी हवे असलेले साहित्य विहिरीवर पोहचविण्यात आले आणि पाणी उपसण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली.दरम्यान रात्री ११ वाजता तब्बल १३ तासानंतर मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.

स्थानिक चिखली रोडवरील खासगी बाजार समितीच्या मागिल नाल्यामध्ये विहिरीचे खोदकाम करण्यात आले. या विहिरीला ३० ते ४० फुट पाणी आहे. तर बांधकामासाठी विहिरीवर फर्मे टाकण्याचे काम सुरु करण्यात आलेहोते. १६ जून रोजी सकाळी ९ वाजता नेहमीचप्रमाणे अटाळी

ता. खामगाव येथील गजानन सदाशिव भाकरे, मोहन शिवाजी मुंडे, महादेव मन्सारा बिल्लेवार, प्रदिप मनोज बेलदार, नझूलसिंग येळाजी काळे, भगवान महादेव दांदळे असे ६ मजूर कामावर गेले होते. फर्मा टाकण्यासाठी व माती भरण्याचे काम हे मजुर करीत असतांनाच अचानक विहिरीचा फर्मा घसरला. या फर्मा सोबतच भगवान महादेव दांदळे वय ३२ हा मजूर विहिरीत पडला. त्याच्या अंगावर फर्म्याचा मलबा व माती कोसळून तो त्या खाली दबला. ही माहिती इतर मजुरांनी गावात व संबंधित ठेकेदाराच्या एजंटला दिली. आणि पोस्टेलाही कळविले. त्यामुळे घटनास्थळी पोलीस दाखल झाले. परंतु पाणी उपसण्यासाठी हवी तशी यंत्रणा विहिरीवर उपलब्ध झाली नाही. शेवटी अटाळी वासियांच्या संयमाचा बांध फुटून त्यांनी शहर पोलीस स्टेशन गाठले व ठाणेदार रामकृष्ण पवार यांच्यासोबत चर्चा केली.यावेळी शिवसेना शिंदे गटाचे ॲड. अमोल अंधारे व राजेंद्र बघे यांचीसुध्दा उपस्थिती होती. या चर्चेनंतर यंत्रणा जागी झाली व ठाणेदार पवार व ॲड. अंधारे यांच्या पुढाकारातून पाणी उपसण्यासाठी २० एच. पी. च्या इलेक्ट्रीक मोटार व मोठे जेनरेटर घटनास्थळी पाठविले व ते स्वतःही हजर झाले. तसेच तहसीलदार सुनिल पाटील, मंडळ अधिकारी, तलाठी, संबंधित अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि दुपारी ४:३० वाजता पासून विहिरीतील पाणी उपसण्यासाठी सुरुवात झाली. तर रात्री ११ वाजता मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी स्थानिक सामान्य रुग्णालयात ठेवण्यात आला.

# ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविल्यास तीव्र आंदोलन छेडणार !

♦ कार्यकारी अभियंता आर.जी तायडे यांना निवेदनाद्वारे शिवसेनेचा इशारा

प्रतिनिधी १७ जून



**मलकापुर :** वीज ग्राहकांच्या मनात स्मार्ट मीटरबाबत संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली असताना, सर्वसामान्य ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा शिवसेना (उध्दवसाहेब ठाकरे) पक्षाचे सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने सह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी विधानसभेत स्पष्टपणे सांगितलेले आहे की, राज्यातील सामान्य घरगुती वीज ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर सक्तीने बसविले जाणार नाहीत. मात्र दुसरीकडे महावितरणकडून ग्राहकांना 'पुढील ४८ तासांत तुमचे मीटर बदलण्यात येणार आहे' असे संदेश पाठविले जात आहेत. त्यामुळे सरकारचे म्हणणे आणि महावितरणची प्रत्यक्ष कृती यामध्ये मोठी विसंगती दिसून येत आहे. जर स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती नसेल, तर ग्राहकांना अशा प्रकारचे संदेश कोणाच्या आदेशाने पाठवले जात आहेत? महावितरण आणि स्मार्ट मीटर बसविणाऱ्या ठेकेदार कंपन्या ग्राहकांवर दबाव आणत आहेत का? असा सवाल आता सर्वसामान्य वीज ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे.

वीज ग्राहकांची संमती न घेता, त्यांना पुरेशी माहिती न देता आणि त्यांच्या शंकांचे निरसन न करता स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न हा लोकशाही मूल्यांच्या विरोधात असून जनतेची दिशाभूल करणारा आहे. सरकार एक भूमिका मांडत असताना महावितरण आणि संबंधित ठेकेदार वेगळीच भूमिका घेत असतील, तर यामागील सत्य राज्य सरकारने जनतेसमोर स्पष्ट करावे.शिवसेनेची स्पष्ट भूमिका अशी आहे की, कोणत्याही वीज ग्राहकाच्या मर्जीविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्यात येऊ नयेत. ग्राहकांची पूर्वसंमती, पारदर्शक माहिती आणि निवडीचे स्वातंत्र्य यांचा पूर्ण आदर राखला गेला पाहिजे.अन्यथा महावितरण आणि स्मार्ट मीटर ठेकेदारांच्या मनमानी कारभाराविरोधात शिवसेना पक्षाच्या वतीने तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल.'वीज ग्राहकांना विश्वासात न घेता कोणताही निर्णय लादला जाणार नाही. जनतेच्या हक्कांसाठी शिवसेना रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,' असेही निवेदना दाखवून नमूद केले निवेदनावर शिवसेना सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले, युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम घोंगटे, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, संतोष दिघे, किसान सेना उपतालुकाप्रमुख गजानन मेहेंगे, विभाग प्रमुख सत्तार शाह, रफीकभाई पजायेवाले, विवेक घोंगटे ,शे.शब्बीर, सलीम खान, अमीत राजपूत,इजहार्उलहक सह आदिंची उपस्थिती होती.

# विवाहितेसह 2 वर्षीय मुलगा बेपत्ता

प्रतिनिधी १७ जून

**मलकापूर :** माहेरवरून सासरी जाण्यासाठीनिघालेल्या २१ वर्षीय विवाहीतेसह तिचा दोन वर्षीय मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार मुलीच्या आईने दिल्यावरून मलकापूर शहर पो. स्टे. ला मिसिंगची नोंद घेण्यात आली आहे. सौ. अर्चना यशवंत जवरे रा. वडनेर भोलजी ता. नादुंरा यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्यांची मुलगी पायल रुपेश निकम (वय २१) व नातू शंशाक रुपेश निकम (वय २) रा. हनुमान नगर, दोन नंबर पेट्रोलपंप भुसावळ हे सुमारे १५ दिवसांपूर्वी माहेरी आले होते. १४ जून रोजी संध्याकाळी ६.३० वाजताच्या सुमारास पायल व तिच्या मुलास भुसावळ येथे सासरी जाण्यासाठी मलकापूर बसस्थानकावर आले. त्यानंतर त्यांना मलकापूर-भुसावळ एसटी बसमध्ये बसवून दिले होते. मात्र दुसऱ्या दिवशी १५ जून रोजी सकाळी जावई रुपेश निकम यांनी फोन करूनसांगितले की, पायल व शंशाक हे भुसावळ येथे पोहोचले नाही. त्या दोघांचा नातेवाईक व परिसरात शोध घेतला. मात्र ते कोठेही आढळून आले नाही. पायल हिचा रंग सावळा, उंची ६ फुट, चेहरा गोल, केस काळे, गालावर तीळ, मानेवर तीळ, अंगात आकाशी कलरची साडी, ग्रे कलरचा ब्लाउज, पायात सेंडल गळ्यामध्ये चांदीची चैन असूनशंशाक याचा रंग सावळा, उंची २ फुट, चेहरा गोल, केस भुरकट, तोंडात चारदांत असून अगात हाफ बाह्याचे पांढरे रंगाचे फुले असलेले शर्ट, थ्री फोर काळ्या रंगाची चड्डी, हातामध्ये चांदीचे कडे असे वर्णन असून संबंधित विवाहीता बालकाबाबत कोणाला माहिती मिळाल्यास मलकापूर शहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलिसांनी मिसिंग क्र ४४/२०२६ दाखल केला असून अधिक तपास पोहेका अमोल शेळे करीत आहेत.

# अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण झाले पाहिजे - ना. प्रतापराव जाधव

**मेहकर :** एस. सी प्रवर्गातील अनेक जाती विखुरलेल्या व असंघटित आहेत. नेतृत्वाचा अभाव त्यामुळे संघटित होणे अवघड आहे. यातीलच मातंग समाज सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक दृष्ट्या मागे राहिला आहे. या समाजाची आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी रास्ता आहे. एस सी मधील आरक्षण उपवर्गीकरणाला माझा पाठिंबा आहे. असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. सकल मातंग समाजाच्या वतीने १६ जून रोजी विजय अंभोरे, साहेबराव पाटोळे, शांताराम तायडे यांचे नेतृत्वात त्यांना आरक्षण उपवर्गीकरणासंदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, की आरक्षण उपवर्गीकरणाच्या विषयी सर्वोच्च न्यायालयाने २०२४ ला निकाल दिलाः मात्र सन २००० ला मी आमदार असताना एस.सी. प्रवर्गाचे उप वर्गीकरण झाले पाहिजे ही भूमिका मांडली.

# स्वाधार योजनेसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश अर्ज बंधनकारक

प्रतिनिधी १७ जून

**बुलढाणा :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या निर्देशानुसार, गुणवत्तेनुसार अथवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, त्यांनाच स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र मानले जाईल. मात्र, वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज न करणारे विद्यार्थी शासकीय वसतिगृह तसेच स्वाधार योजना या दोन्ही सुविधांपासून वंचित राहू शकतात. मागील परीक्षेत किमान ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी पात्रता राहणार आहे. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे उपलब्ध नाहीत, तेथे या नियमात शिथिलता असली तरी विद्यार्थ्यांनी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७साठी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया १० जून २०२६ पासून सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इयत्ता ८ वी ते १० वी (शालेय विभाग) ३० जून २०२६ पर्यंत तर इयत्ता ११ वी व १२ वी (कनिष्ठ महाविद्यालय) १५ जुलै तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दि. १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट तसेच आवश्यक कागदपत्रांच्या प्रती संबंधित शासकीय वसतिगृह कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करणे बंधनकारक आहे. समाज कल्याण विभागांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहां मध्ये सन २०२६-२७या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेशाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र व गरजू विद्यार्थ्यांनी वेळेत ऑनलाइन अर्ज सादर करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# दारूच्या नशेत कुऱ्हाडीचा वार; तरुण गंभीर जखमी

प्रतिनिधी १७ जून

**खामगाव :** दारू पिण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना खामगाव तालुक्यातील वाडी येथे घडली. या प्रकरणी खामगाव शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दत्ता भास्कर जवंजाळ (३७) रा. जुनी वाडी, खामगाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंगेश भानुदास खोंड (३०) रा. वाडी, ता. खामगाव याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०९, ३५२ व ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. १५ जून रोजी रात्री ९ बाजताच्या सुमारास वाडी येथील जुन्या पाण्याच्या टाकीजवळ ही घटना घडली.

फिर्यादीचा चुलत भाऊ नागेश मधुकर जयंजाळ हा घरातून बाहेर गेल्यानंतर परत न आल्याने त्याचा शोध घेण्यात आला. यावेळी तो आरोपीच्या घराजवळ असल्याचे समजल्याने फिर्यादी तेथे पोहोचले. त्यावेळी आरोपीच्या हातात लाकडी दांडा असलेली कुऱ्हाड होती. आरोपीने नागेशच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार केल्याने तो गंभीर जखमी होऊन खाली कोसळला. हल्लधानंतर आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. जखमी नागेश ला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप गोदाने करीत आहेत

# मीटरमध्ये रेझिस्टरचा खेळ; ११ महिन्यांची वीजचोरी उघड

प्रतिनिधी १७ जून

**खामगाव :** महावितरणच्या भरारी पथकाने केलेल्या तपासणीत वीज मीटरमध्ये तांत्रिक छेडछाड करून विज चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रकरणी खामगाव तालुक्यातील माथनी येथील एका व्यक्तीविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत कलोरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, माथनी येथील फरीद खान सरवर खान यांच्या घरगुती विजमीटरची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान मीटरची कार्यप्रणाली संशयास्पद आढळल्याने ते उघडून पाहण्यात आले. त्यावेळी मीटरच्या पीसीबीवर अतिरिक्त रोषक (रेझिस्टर) बसवून मीटरच्या नोंदीमध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आले. या छेडछाडीमुळे गेल्या ११ महिन्यांपासून महावितरणची सुमारे १,१०३ युनिट विज विनापरवाना मापरण्यात आल्याचे तपनात निष्पन्न झाले. या विजचोरीमुळे महावितरणचे १६ हजार ७८२ रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज असून तडजोड शुल्कासह संबंधित रकम १८ हजार ७८२ रुपये इतकी ठरविण्यात आली आहे. भरारी पथकाने तयार केलेल्या अहवालाच्या आधारे आरोपीविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी सिंगल फेज विजमीटर जाम करण्यात आले आहे. खामगाव शहर पोलिसांनी अपराध क्रमांक ३२१/२०२६ नोंदविला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद खांबलकर करीत आहेत. महावितरणच्या विशेष तपास मोहिमेदरम्यान हा प्रकार उघडकीस आल्याने वीजचोरी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# जिल्ह्याला मिळणार आता ६५ गुणवंत केंद्रप्रमुख!

प्रतिनिधी १७ जून

**चिखली :** जिल्ह्यातील शैक्षणिक व्यवस्थेला बळकटी देणारी महत्त्वाची घडामोड सध्या जिल्हा परिषदेत घडत असून, केंद्रप्रमुख पदाच्या नियुक्ती प्रक्रियेला अंतिम स्वरूप प्राप्त झाले आहे. स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता सिद्ध करून यश मिळविणाऱ्या ६५ उमेदवारांची केंद्रप्रमुख पदासाठी निवड झाली असून, लवकरच त्यांच्या नियुक्त्या होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, निवड झालेल्या उमेदवारांमध्ये उच्च शैक्षणिक पात्रता आणि उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी असलेल्या शिक्षकांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. यामध्ये पीएच. डी. धारक, नेट उत्तीर्ण, सेट उत्तीर्ण, पीएच. डी. संशोधन फेलो तसेच राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित शिक्षक यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयबीपीएस या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या मदतीने केंद्रप्रमुख पदासाठी स्पर्धापरीक्षेचे ऑनलाइन आयोजन केले होते.

# पत्नी व मुलांना भेटणे ठरले महाग; तरुणावर चाकूहल्ला, तिघांवर गुन्हा

प्रतिनिधी १७ जून

**खामगाव :** कौटुंबिक वादाच्या पार्श्वभूमीवर पत्नी व मुलांना भेटण्यासाठी सासरच्या गावी गेलेल्या एका तरुणावर चाकूने हल्ला झाल्याची घटना उमरा येथे घडली. या प्रकरणी पत्नीसह तिच्या दोघा भावांविरूद्ध पिंपळगाव राजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,तरोडा येथील साजन तेजराव शिंदे (२३) यांनी याबाबत तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, पत्नी हिरकणी शिंदे ही गेल्या सात महिन्यांपासून उमरा येथे वास्तव्यास आहे. सोमवारी (दि. १५) सकाळी साजन शिंदे हे पत्नी व मुलांची भेट घेण्यासाठी उमरा येथे गेले होते. यावेळी दोघांमध्ये वाद निर्माण झाला, वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर पत्नीने शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर आबाराय बाबाराव सावंत याने हातातील चाकूने फिर्यादीच्या डोक्यावर व डाव्या हातावर वार करून जखमी केले. तसेच सचिन बाबाराव सावंत याने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर जखमी तरुणाने वैद्यकीय उपचार घेत पोलिसांत धाव घेतली. तक्रार व वैद्यकीय अहवालाच्या आधारे पिंपळगाव राजा पोलिसांनी हिरकणी शिंदे, आबाराव सावंत आणि सचिन सावंत यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉनटेबल रामदास गायकवाड करीत आहे.

# रोजगाराची हमी देणाऱ्या 'आय. टी. आय' ची प्रवेश प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी १७ जून

**नांदुरा :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदुरा येथे प्रवेश सत्र २०२६ करिता २१ मे पासून प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असून अर्ज करण्याची शेवटची तारीख २१ जून आहे. यावर्षी आयटीआयमध्ये १२४ जागांसाठी प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, शुल्क भरणे, कागदपत्र पडताळणी आणि प्रवेश निश्चितीची प्रक्रिया सुलभ झाली आहे.

संस्थेत यावर्षी विविध अभ्यासक्रम व्यवसाय उपलब्ध आहे. व्यवसायाचे नाव प्रवेश क्षमता व शैक्षणिक पात्रतेनुसार प्रवेश निश्चित केला जाणार आहे. यात बेसिक कॉस्मेटोलॉजी २४ जागा पात्रता १० वी पास, ड्रेस मेकिंग २० जागा पात्रता १०वी पास / नापास, वेल्डर ४० जागा पात्रता १० वी पास/नापास, फिटर (जोडारी) २० जागा पात्रता १०वी पास, पंप ऑपरेटर कम मेकॅनिक २० जागा पात्रता १०वी पास, आयटीआय प्रवेशासाठी ँस्रेग्दह. अन्ु.दन.ग्ह या संकेतस्थळावर अर्ज करावा. अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंट व त्यासंबंधी कागदपत्रांसह संस्थेत येऊन अर्जाची छाननी करून अर्ज निश्चित करावा व विकल्प सादर करावा प्रवेश कामकाजासाठी संस्था शनिवार रविवार तसेच शासकीय सुट्ट्यांच्या दिवशी सुद्धा सुरू असेल. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी संस्थेची संपर्क साधावा किंवा फोन करावा. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिमा ५०० रुपये विद्यावेतन देण्यात येते सध्या जागतिक स्तरावर कुशल मनुष्यबळाची गरज असल्यामुळे कौशल्य धारित रोजगाराच्या वाढत्या संधी उद्योग क्षेत्रातील मागणी आणि कमी कालावधीत रोजगारक्षम शिक्षण यामुळे मागील काही वर्षांपासून विद्यार्थ्यांचा आयटीआय अभ्यासक्रमांकडे कलवाडा चालला आहे. आयटीआय पास विद्यार्थ्यांना रोजगाराच्या खूप संधी उपलब्ध आहेत. आयटीआय प्रवेश अर्ज भरण्याकरिता मोजकेच दिवस शिल्लक असल्याने जास्तीत जास्त उमेदवारांनी आयटीआयच्या प्रवेश प्रक्रियेत सहभाग घ्यावा. असे आवाहन संस्थेचे प्राचार्य जी. एन. काळे यांनी केले आहे

# खरीप 20 25 मधील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा मंजूर करा

## 'शेतकरी योद्धा कृती समिती'चे एसडीओंमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी १७ जून

**सिंदखेडराजा :** खरीप २०२५ च्या हंगामात अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश पावसामुळे सिंदखेडराजा, देऊळगाव राजा व लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, अद्यापही हजारो शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित आहेत. या सर्व पात्र आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने न्याय्य पीक विमा मंजूर करावा, तसेच आगामी खरीप २०२६ साठी खरीप २०२३-२४ मधील जुने पीक विमा ट्रिगर व निकष पुन्हा लागू करावेत, या मागण्यांसाठी 'शेतकरी योद्धा कृती समिती, बुलढाणा जिल्हा' च्या वतीने आज १५ जून २०२६ रोजी सिंदखेडराजा येथील उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत (ए३६) राज्याचे मुख्यमंत्री, कृषिमंत्री आणि केंद्रीय कृषिमंत्र्यांना एक जाहीर निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, खरीप २०२५ च्या हंगामात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीची पाहणी स्वतः लोकप्रतिनिधी, मंत्री व प्रशासनाने प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली होती. राज्य शासनाने याची दखल घेत संबंधित भागातील आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असल्याची नोंद मान्य करत प्रति हेक्टर ८,५०० रुपयांची अतिवृष्टी मदत वितरित केली होती. मात्र, 'नुकसान मान्य, पंचनामे मान्य, मदत मान्यः परंतु पीक विमा मात्र नामंजूर' अशी अत्यंत अन्यायकारक परिस्थिती निर्माण झाली असून हजारो शेतकरी हक्काच्या विम्यापासून वंचित राहिले आहेत.

समितीने निवेदनात पुढे नमूद केले आहे की, खरीप २०२३-२४ मध्ये अस्तित्वात असलेले पीक विमा ट्रिगर व निकष हे पूर्णपणे शेतकरी हिताचे होते. मात्र, त्यानंतर खरीप २०२४-२५ मध्ये लागू करण्यात आलेल्या नवीन क्लिष्ट ट्रिगर आणि निकषांमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही अनेक शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहिले. परिणामी, राज्यातील लाखो शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचा पीक विमा योजनेवरील विश्वास उडाला आहे. शेतकरी योद्धा कृती समितीच्या प्रमुख मागण्याः खरीप २०२५ मधील सर्व पात्र व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने न्याय्य पीक विमा मंजूर करण्यात यावा. सिंदखेडराजा, देऊळगाव राजा व लोणार तालुक्यातील सर्व प्रलंबित पीक विमा प्रकरणांचा फेरविचार करावा. खरीप २०२४-२५ मध्ये लागू करण्यात आलेले जाचक पीक विमा ट्रिगर व निकष तातडीने रद्द करावेत. खरीप २०२३-२४ मध्ये अस्तित्वात असलेले शेतकरी धार्जिणे ट्रिगर व निकष आगामी खरीप २०२६ पासून पुन्हा लागू करावेत. पीक विमा योजनेमध्ये संपूर्ण पारदर्शकता आणून प्रत्येक पात्र व नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळेल याची लेखी हमी द्यावी. या प्रसंगी लोकजागर परिवाराचे सर्वेसर्वा प्रवीण गीते, शेतकरी योद्धा कृती समितीचे प्रदेश अध्यक्ष गजानन जायभाये, बंजारा सेवा संघाचे दत्तू चव्हाण सर, रा. का. चे कार्याध्यक्ष विनायक भानुसे पाटील, बळीवंशचे नितीन कायंदे, उबाठाचे सिद्धेश्वर आंधळे, सामाजिक कार्यकर्ते गजानन दराडे यांनी मोर्चास संबोधित केले.

मोर्चात सहभागी झालेल्या सर्व शेतकरी, कार्यकर्ते व संघटनांचे शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने आभार मानण्यात आले. यापुढील लढ्यातही शेतकऱ्यांनी एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन शेतकरी योद्धा कृती समिती, बुलढाणा जिल्हा, बालाजी सोसे यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# हिवरखेड येथे विषबाधेने 55 शेळ्या दगावल्या

प्रतिनिधी १७ जून

**हिवरखेड :** येथील फाटकाची शेवडी शिव शेत शिवराजवळ बकऱ्या चारापाणी करत असताना ,अचानक विषबाधा झाल्याचे बकऱ्या चारणारे ढोरकी यांच्या लक्षात येताच त्यांनी आजुबाजूच्या शेतशिवारातील शेतकऱ्यांची मदत घेऊन पशु वैद्यकीय दवाखान्यात काही बकऱ्या उपचार घेण्यासाठी आणल्या. तर काही घटनास्थळी दगावल्या. एकूण ५५ बक-या दगावल्या.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अबोली कथे व कर्मचारी राजेश वायकर यांनी विषबाधा झालेल्या शेळ्या वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांना बजरंग तिडके, अन्सार खा, संतोष पटोळे, अर्जुन खिरोडकार, प्रणव इंगळे, संतोष मानकर, आबिद खा, दत्तू धुरदेव, राजेश राजनकार यांनी सहकार्य केले. तसेच मंडळ अधिकारी डी.आर.झापे, तलाठी समीर खान, मोहन कुलाळ यांनी

## ♦ विषारी पाणी पिल्याची चर्चा



पंचनामा केला. तर नगरपरिषद कडून मृत बकऱ्या पुरण्यासाठी जेसीबीची व्यवस्था करण्यात आली. भाजपचे रमेश दुतोंडे यांनी आमदार प्रकाश भारसाकळे यांच्याकडे मदतीची मागणी करुन नुकसान भरपाईचे प्रयत्न करू असे स्पष्ट केले. घटनास्थळी ठाणेदार सचिन पाटील व पोलिस कर्मचारी यांनी भेट दिली. शिवसेनेचे रवी घुंगळ, पत्रकार गणेश सुरजोस, बाळासाहेब नेरकर यांनी सुद्धा धाव घेतली. बक-या कष्टकऱ्यांच्या होत्या. त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अब्दुल कलाम अब्दुल कादर (३), मोहन केदार (२), मुक्कदर खा समशेर खा (१), रेखा मानकर (९) गणेश मानकर (२), श्रीकृष्ण सुरळकार (२), अनिल सोनाने (१), रियाज खा (१), अमोल तायडे (१), गजानन भटकर (१), आबिद खा (२), मुजमबीर खा (१), गोविंदा कांबळे (१), संतोष मानकर (२), अनिल गवई (१), विजय रायबोले (३), नामदेव पडोरे (५), जमिरोद्दीन (१), पंकज तिडके (३), पंजाबराव सुभेदार (४), राजेश राजनकार (३) अशा बक-या मरण पावल्या. शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी होत आहे.

# उबाठाचे विदर्भातील एकमेव खासदार संजय देशमुख शिंदे सेनेच्या वाटेवर?

## ♦ दिल्लीत हालचाली : राजकीय चर्चांना उधाण; निवासस्थानी 'शुकशुकाट'

प्रतिनिधी १७ जून




**यवतमाळ :** उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाचे विदर्भातील एकमेव खासदार संजय देशमुख हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश करण्याच्या मार्गावर असल्याची जोरदार राजकीय चर्चा जिल्ह्यात आणि राज्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातून त्यांनी शिंदे गटाच्या उमेदवार राजश्री पाटील यांचा पराभव करत विजय मिळवला होता. गेल्या काही दिवसांपासून देशमुख हे शिंदे गटातील वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात असल्याचे सांगितले जात आहे. पक्षांतर्गत घडामोडींमध्ये त्यांचा वाढता सहभाग आणि काही महत्त्वाच्या बैठकींना त्यांची मर्यादित उपस्थिती यामुळे या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांनी बोलावलेल्या बैठकीला ते प्रत्यक्ष उपस्थित न राहता ऑनलाइन सहभागी झाल्याचेही समोर आले होते. दरम्यान, शिंदे गटाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रताप जाधव यांच्यासोबत देशमुख यांनी नुकतीच भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर लगेचच त्यांची दिल्लीला झालेली रवाना ही राजकीय दृष्ट्या महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

दुसरीकडे, दिग्रस शहरालगतच्या चिंचोली येथील त्यांच्या निवासस्थानी नेहमी दिसणारी कार्यकर्त्यांची वर्दळ आज मात्र पूर्णपणे कमी झाल्याचे दिसून आले. निवासस्थानी जाणवलेला 'शुकशुकाट' हा देखील चर्चेचा विषय ठरला आहे. स्थानिक राजकीय वर्तुळात या घडामोडींमुळे उबाठा गटात अस्वस्थता पसरल्याची चर्चा आहे. संजय देशमुख यांच्या संभाव्य पक्षांतराबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, पुढील काही दिवसांत याबाबत स्पष्ट चित्र समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे यवतमाळ-वाशिम मतदारसंघासह संपूर्ण विदर्भातील राजकीय समीकरणांवर याचा परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# 1 लाखाची लाच घेताना पालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला पकडले

प्रतिनिधी १७ जून

**अमरावती:** अमरावतीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) १ लाखाच्या लाचेप्रकरणी महानगरपालिकेचे सहायक पशुवैद्यकीय अधिकारी (प्रभारी), सचिन छगनप्पा बोंद्रे यांना ताब्यात घेतले आहे. तक्रारदाराच्या संस्थेने अमरावती महानगरपालिकेअंतर्गत श्वान नियंत्रण, नसबंदी आणि लसीकरणाचे काम केले होते. या कामाच्या मोबदल्यात, अधिकारी सचिन बोंद्रे यांनी ५७ लाखांची थकीत बिले देण्यासाठी २५ लाखांची लाच मागितली.नंतर, पहिला हप्ता म्हणून २ लाखांची मागणी करण्यात आली, जी

## ♦ एसीबीकडून मोठी कारवाई

वाटाघाटीनंतर कमी करून १ लाख करण्यात आली. एसीबीने ११ जून २०२६ रोजी सापळा रचला. त्या दिवशी, संबंधित अधिकारी तक्रारदाराच्या मोटरसायकलवरून महानगरपालिका कार्यालयातून निघून कोतवाली चौकाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, संशय आल्याने त्याने लाच घेण्यास नकार दिला आणि तो सरकारी वाहनातून निघून गेला. यानंतर, त्या अधिकाऱ्याला त्याच्या निवासस्थानी ताब्यात घेण्यात आले. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अंतर्गत त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. एसीबी अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक बापू बांगर आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या पथकामध्ये उपअधीक्षक सुनील किंगे, पोलीस निरीक्षक नीलिमा सातव आणि रवींद्र सहारे, तसेच पोलीस अधिकारी उपेंद्र थोरात आणि वैभव जयले यांचा समावेश होता. एसीबीने अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि बुलढाणा येथील नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी कोणत्याही कायदेशीर कामासाठी अतिरिक्त पैशांची मागणी करत असल्यास, त्यांनी तात्काळ एसीबीशी संपर्क साधावा.

# देशमुख महिला मंडळाचा सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी १७ जून



**अकोला :** देशमुख महिला मंडळ दर महिन्याला एक सामाजिक उपक्रम राबवीत असते. या महिन्यात सदर जबाबदारी बनारसी गृपला मिळाली होती . सध्याच्या परिस्थिती बघता मुलांवर चांगले संस्कार होण खूप गरजेच आहे. डोंगरगाव मधील अंबामाता मंदिर संस्थान येथे 'आदर्श बालसंस्कार शिबीर 'वाघमारे, पाचपोर गुरूजी व त्यांचा चमू दरवर्षीच एक महिन्याच शिबीर आयोजित करतात त्यात अमरावती, सोनाळा, मूर्तीजापूर ,तेल्हारा अशे लांब लांबून मुल येत असतात ७० ते ८० मुल तीथे होते त्या मुलांना अन्नदान करण्यात आले सोबतच पाण्याच्या बॉटल व हनुमान चालीसा भेट देण्यात आले.तेथे सात वर्षापासून तर वीस वर्षापर्यंत चे मुले होते आणि त्यांचा हरिपाठ पावली बघायला आम्हाला खूप आनंद वाटला. या उपक्रमाला माननीय अध्यक्ष राजश्रीताई चे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी त्या लहान मुलांना पण दिले आणि ज्येष्ठ सल्लागार कविताताई यांचेही मार्गदर्शन लाभले ,सह कोषाध्यक्ष सीमाताई ह्या तसेच बनारसी गृप च्या लीडर विजया, ज्योतीताई , इंदुताई, मंजू ताई, दीप्ती ह्या सदस्य उपस्थित होत्या.










# अकोल्यातील ३३ कुटुंबे अजूनही १ लाख मदतीच्या प्रतीक्षेत

**अकोला :** जिल्ह्यात २०२६ च्या पहिल्या पाच महिन्यांत ६१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यापैकी ३३ कुटुंब शासनाच्या आर्थिक मदतीसाठी पात्र ठरली आहेत. मात्र निधीअभावी त्यांना अद्याप प्रत्येकी १ लाखांचे अर्थसहाय्य मिळालेले नाही. विविध संकटांनी शेतकरी हतबल असताना, मृत्यूनंतरही त्यांच्या

## ६१ आत्महत्या, ३३ पात्र कुटुंबे आणि मदत शून्य

कुटुंबांना मदतीसाठी वाट पाहावी लागत आहे. निधी उपलब्ध नसल्याने मदत रखडली, १५ प्रकरणांची फेरचौकशी सुरू असून शेतकरी संघटनांकडून तातडीने निधी वितरणाची मागणी केली जात आहे.

# अनय नावंदर जिपचे नवीन सीईओ

प्रतिनिधी १७ जून



**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी अनय नावंदर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नाशिक येथून ते येथे येत आहेत. अनिता मेश्राम यांची बदली नागपूरला झाली. त्यामुळे अकोल जिल्हा परिषदेत सीईओ म्हणून कोण रुजू होणार याकडे सर्वांक्ष लक्ष होते. मंगळवारी अनय नावंदर यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हा परिषदेत धडकले.
















हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK